सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

## राज्य व्यवस्थापन कक्ष
## ग्रामीण गृहनिर्माण

# महा आवास अभियान-ग्रामीण

# यशोगाथा



# महा आवास अभियान - ग्रामीण

## साध्य

| | |
|---|---|
| भूमीहीन लाभार्थ्यांना जागा | ४९,८४६ |
| घरकुले मंजूरी | ३,६९,०४९ |
| घरकुलांना प्रथम हप्ता वितरण | ३,८९,९८४ |
| भौतिकदृष्ट्या पूर्ण घरकुले | ३,१७,२७५ |
| प्रगतीच्या विविध टप्प्यांवर | ४,७३,१६१ |
| आर्थिकदृष्ट्या पूर्ण घरकुले | १,१५,१८८ |
| ग्रामीण गवंडी प्रशिक्षण | ८,८१५ |
| डेमो हाऊसेस | ३२० |
| PWL आधार सिडींग | ९,८३,९८५ |
| आवास प्लस आधार सिडींग | ५३,३६,९४१ |
| आवास प्लस जॉब कार्ड मॅपिंग | १६,६२,५२१ |

सत्यमेव जयते



**मा.ना. श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे**
**मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**

# संदेश

महाराष्ट्र शासनाने ग्राम विकास विभागाच्या राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते ०५ जून २०२१ या कालावधीत **"महा आवास अभियान-ग्रामीण"** साजरा करण्याचा स्तुत्य उपक्रम हाती घेतला होता. या अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाली आणि राज्याच्या ग्रामीण भागात बेघरांचे पक्क्या घरांचे स्वप्न पूर्ण होत आहे.

राज्यात ग्रामीण भागामधील भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधणीसाठी जागा उपलब्ध करुन देणे, वाळूसहीत इतर बांधकाम साहित्यांची उपलब्धता, बहुमजली इमारती, गृहनिर्माण वसाहती, डेमो हाऊसेस, विभागीय भौगोलीक परिस्थितीनुसार घरांची रचना, नैसर्गिक आपत्तीरोधक घरे, नवनवीन तंत्रज्ञान, इत्यादी नाविन्यपूर्ण बाबींची या अभियान कालावधीत प्रभावी अंमलबजावणी झाली. तसेच शासनाच्या इतर योजना जसे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण, प्रधानमंत्री उज्वला योजना, उजाला योजना, सौभाग्य योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान, इत्यादींशी कृतीसंगम करुन घरकुलांच्या लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्याचे काम प्रगतीपथावर आहे. अलिकडेच मी पालघर जिल्ह्याला दिलेल्या भेटी दरम्यान याची प्रचिती मला आली आहे. अभियानामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्यांचा शासन पुरस्कार व मानचिन्ह देऊन गौरव करणार आहे.

या अभियानाचा समारोप आज **"ई-गृहप्रवेश"** या कार्यक्रमाने होत आहे. सर्व सोयींनी युक्त अशा अभियान कालावधीत पूर्ण झालेल्या स्वतःच्या मालकीच्या घरात प्रवेश करणाऱ्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेतील सर्व लाभार्थ्यांचे त्रिवार अभिनंदन!

अभियान कालावधित घडलेल्या घडामोडींचा यथोचित वृतांत व अभियानाचे फलित **"महा आवास अभियान-ग्रामीण यशोगाथा"** या विशेषांकामध्ये मांडण्यात आला आहे. या विशेषांकास शुभेच्छा !

उध्दव बाळासाहेब ठाकरे

संदेश



सत्यमेव जयते

**मा.ना. श्री. अजित पवार**
**उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**

# संदेश

राज्यात दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते ०५ जून २०२१ या कालावधीत प्रधान मंत्री आवास योजना-ग्रामीण, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम विकास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतिमान करण्यासाठी व त्यात गुणवत्ता आणण्यासाठी **"महा आवास अभियान-ग्रामीण"** राबविणेबाबत शासनाने निर्णय घेतला होता, हे अभियान यशस्वी झाले असून या अभियानाचा आता समारोप होत आहे.

या अभियानाव्दारे सर्वांच्या क्षमता बांधणीसाठी कार्यशाळा, माहिती, शिक्षण व संवादाचे उपक्रम याव्दारे सर्वांना सक्रिय सहभागी करुन घेण्यात आले. 'राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण' कार्यालयाच्या माध्यमातून या आयोजित केलेल्या अभियानाच्या माध्यमातून राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्र अधिक गतीमान झाले आहे. या योजनांच्या यशस्वीतेसाठी शासकीय यंत्रणेबरोबर समाजातील सर्व घटक जसे- स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था, खाजगी संस्था (Corporates), तंत्र शिक्षण संस्था, पंचायतराज संस्था, बँका, लोकप्रतिनिधी, लाभार्थी, लोक इत्यादींनी मोठ्या प्रमाणात सक्रिय सहभाग दर्शविला. तसेच याकामी सर्व जिल्हा परीषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत पदाधिकारी व सदस्य यांच्या सक्रिय सहभागाबरोबर ग्राम विकास विभागाची क्षेत्रीय यंत्रणा आघाडीवर राहीली. त्यांच्या यशाबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. या यशाचे शासन केवळ अभिनंदन करुन थांबणार नसून त्यांचा पुरस्कार देऊन गौरव देखील करणार आहे.

महाराष्ट्र शासनाने या ग्रामीण गृहनिर्माण योजनांकरीता केंद्र व राज्याच्या माध्यमातून आतापर्यंत भरीव निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. 'राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण' कार्यालयाकडून सदर अभियानाच्या यशाची मांडणी करणारी **"महा आवास अभियान-ग्रामीण यशोगाथा"** या पुस्तिकेस हार्दिक शुभेच्छा ! आणि **"ई-गृहप्रवेश"** च्या माध्यमातून आज सर्व मुलभूत सुविधांनी युक्त अशा स्वत:च्या मालकीच्या घरकुलात प्रवेश करणाऱ्या सर्व ग्रामीण गृहनिर्माण लाभार्थ्यांचे अभिनंदन!

**अजित पवार**

सत्यमेव जयते



**मा.ना.श्री. हसन मुश्रीफ**
**मंत्री, ग्राम विकास, महाराष्ट्र राज्य**

# संदेश

राज्यातील एकूण लोकसंख्येचा महत्वाचा भाग असलेल्या ग्रामीण भागात ग्राम विकास विभागाच्या माध्यमातून विविध ग्रामीण आवास योजनांमधून शासन बेघरांना सर्व सुविधांनी युक्त असा हक्काचा निवारा पुरविण्यात यशस्वी होत आहे. यामध्ये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, राज्य पुरस्कृत रमाई, शबरी, पारधी, आदिम आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना इत्यादी ग्रामीण गृहनिर्माण योजनांबरोबर जागा नसलेल्या लाभार्थ्यांना पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करुन देणे व अतिक्रमणे नियमानुकूल करणे या योजना राबवण्यात येत आहेत.

"राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण" हे कार्यालय या ग्रामीण गृहनिर्माण योजना यशस्वीरीत्या राबवत असून दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते ०५ जून २०२१ या कालावधीत **"महा आवास अभियान-ग्रामीण"** चे आयोजन केले. राष्ट्रीय आवास दिनाच्या निमित्ताने सुरु झालेल्या या अभियानाव्दारे ग्रामीण गृहनिर्माण योजनांना अधिक गतिमानता येऊन गुणवत्ता वाढीमध्ये सुधारणा झाली आहे. या अभियानात सर्वांची क्षमताबांधणी करण्यासाठी कार्यशाळा, जनजागृतीसाठी माहिती शिक्षण व संवादाचे उपक्रम व अभियान उपक्रमांवार भर देण्यात आला. या अभियानात ग्राम विकास विभागाच्या अधिनस्त सर्व यंत्रणा मनापासून सक्रिय सहभागी दर्शवून हे अभियान यशस्वी केल्याबद्दल मला आनंद वाटत आहे. विशेषतः जिल्हा परिषद अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, प्रकल्प संचालक, गट विकास अधिकारी, सरपंच, ग्राम विकास अधिकारी तथा ग्रामसेवक यांच्या मोलाच्या सहभागाबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

अभियान कालावधीमध्ये पंचायत राज संस्था (जिल्हा परीषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत), स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था, कॉर्पोरेट संस्था, लाभार्थी व लोकसहभाग यांच्या माध्यमातून मूलभूत सुविधा देवून 'आदर्श घरांची' निर्मिती करण्यात आली आहे. तसेच आय.आय.टी. मुंबई यांच्याशी भागीदारी करुन ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांना प्रशिक्षित करण्याचे काम हाती घेतले असून याचा मोठ्या प्रमाणात फायदा ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये होणार आहे.

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण या कार्यालयाने विकसित केलेली अभियान यशस्वीतेची मांडणी करणारी **"महा आवास अभियान-ग्रामीण यशोगाथा"** ही पुस्तिका राज्यातील इतर योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी इतर विभागांना देखील मार्गदर्शक ठरेल याची खात्री आहे. **"ई-गृहप्रवेश"** कार्यक्रमाच्या माध्यमातून मुलभूत सुविधांनी युक्त पक्क्या घरात प्रवेश करणाऱ्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेतील सर्व लाभार्थ्यांचे अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा!

**हसन मुश्रीफ**

सत्यमेव जयते



**मा.ना.श्री. अब्दुल सत्तार,**
**राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल, महाराष्ट्र राज्य**

# संदेश

महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास विभागाचे "राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण" या कार्यालयाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बेघरांना घर देण्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण त्याचबरोबर रमाई, शबरी, पारधी, आदिम आवास योजना अशा अनेक ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येत आहेत. या योजना अधिक गतीमानपणे अंमलात आणण्यासाठी व त्यामध्ये गुणवत्ता आणणेसाठी "राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण" कार्यालयाने **"महा आवास अभियान-ग्रामीण"** राबविण्यात पुढाकार घेऊन ते यशस्वी करुन दाखविले याबद्दल मला फार आनंद वाटतो.

लाभार्थ्यांना घरकुलासाठी आवश्यक बांधकाम साहित्य उदा. वाळू उपलब्ध होणेसाठी शासनाच्या महसूल विभागाच्या शासन निर्णय व शासन राजपत्रानुसार महसुल यंत्रणेची मदत मिळाली आहे. शासनाच्या विविध ग्रामीण आवास योजना, इतर योजनांशी कृतीसंगम, नाविन्यपूर्ण उपक्रम इ. याबाबत अभियानाच्या माध्यमातून क्षेत्रीय यंत्रणा व लाभार्थ्यांमध्ये अधिक जागरुकता आणण्यासाठी व त्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी उत्कृष्ट काम करणाऱ्यांना पुरस्कार सुध्दा देण्याची कल्पना स्तुत्य आहे.

२० नोव्हेंबर, २०२० ते ०५ जून, २०२१ या कालावधित राबविण्यात आलेल्या या अभियानामुळे राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण योजनेतील लाभार्थ्यांना सर्व सुविधांनी युक्त असे घरकुल प्राप्त झाले आहे. यांच्याकडे घर बांधण्यासाठी जमीन उपलब्ध नव्हती अशा अनेक लाभार्थ्यांना शासनाच्या अनेक योजनांमधून जमीन उपलब्ध करुन देण्यात आली असून उर्वरीत जमीन नसलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेमधील लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यासाठी पुढाकार घेण्याची शासनाची तयारी आहे. त्याचबरोबर गृहसंकुल, बहुमजली इमारती या सारख्या नाविन्यपूर्ण उपक्रमांतून जमिनीची असलेली कमतरता यावर यशस्वीपणे मात करण्यात हे अभियान यशस्वी ठरले आहे.

**"ई-गृहप्रवेश"** या कार्यक्रमाव्दारे सर्व सोयींनी युक्त अशा स्वत:च्या मालकीच्या घरात प्रवेश करणाऱ्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेतील सर्व लाभार्थ्यांचे त्रिवार अभिनंदन! तसेच **"महा आवास अभियान-ग्रामीण यशोगाथा"** या विशेषांकास शुभेच्छा !

**अब्दुल सत्तार**

सत्यमेव जयते



**मा. श्री. सिताराम कुंटे, भा.प्र.से.**

**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

# संदेश

**"सर्वांसाठी घरे - २०२२"** हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्यशासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना या राज्य पुरस्कृत योजना अभियान स्वरुपात राबविण्यात येत आहेत.

राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात सुरु असलेल्या कामास अधिक गती देण्यासाठी, त्यातील गुणवत्तावाढीसाठी दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते ०५ जून २०२१ या कालावधीत राबविण्यात आलेल्या **"महा आवास अभियान-ग्रामीण"** च्या दैदिप्यमान यशाबद्दल मला आनंद वाटतो.

अभियान कालावधीत सर्व भागधारकांची क्षमता बांधणी, माहिती, शिक्षण व संवाद या बाबींवर भर देऊन अभियानाची उद्दिष्टे साध्य करण्यात आली. उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था/व्यक्तींना पुरस्कार देवून त्यांना प्रोत्साहीत करण्यात येणार असल्याने ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अधिक प्रगती होईल याची मला खात्री वाटते.

केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत या गृहनिर्माण योजनांशी संबंधीत विभागांचे सचिव, राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित सर्व शासकीय यंत्रणा या अभियानात सक्रीय सहभागी होऊन हे अभियान यशस्वी केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

ग्राम विकास विभागाच्या "राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण" कार्यालयामार्फत विकसीत **"महा आवास अभियान-ग्रामीण यशोगाथा"** या पुस्तिकेस हार्दिक शुभेच्छा. महा आवास अभियान-ग्रामीण समारोप प्रसंगी आयोजित ई-गृहप्रवेशाव्दारे गृहप्रवेश करणाऱ्या सर्व लाभार्थ्यांचे अभिनंदन !

**सितराम कुंटे, भा.प्र.से.**

संदेश

सत्यमेव जयते



**मा.श्री. राजेश कुमार, भा.प्र.से.**
**अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग,**
**महाराष्ट्र शासन**

# संदेश

**"सर्वांसाठी घरे - २०२२"** या शासकीय धोरणानुसार राज्यामध्ये ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात काम सुरु आहे. संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत ध्येये (Sustainable Development Goals) मधील धोरण क्रमांक ११ नुसार किफारयतशीर गृहनिर्माण (Affordable Housing) क्षेत्रात काम झाल्यास एकूण १७ SDG पैकी किमान १४ SDG वर सकारात्मक प्रभाव पडणार आहे. यासाठी घरकुलांच्या कामाची प्रगती फक्त संख्यात्मक न राहता गुणात्मक रहावी, नाविन्यपूर्ण कल्पना अंमलात आणून लाभार्थ्यांना सर्व सुविधांनी युक्त असे घरकुल उपलब्ध करुन द्यावे, तसेच नैसर्गिक आपत्तीस सक्षमपणे सामोरे जाणारे घरकुल बांधण्यासाठी पुढाकार घ्यावा असे शासनाचे ध्येय आहे.

त्या पार्श्वभूमीवर 'राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण' कार्यालयामार्फत **"महा आवास अभियान-ग्रामीण"** चे माध्यमातून भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधणीसाठी जागा उपलब्ध करुन देणे, वाळूसहीत इतर बांधकाम साहित्यांची उपलब्धता, बहुमजली इमारती, गृहनिर्माण वसाहती, डेमो हाऊसेस, विभागीय भौगोलीक परिस्थितीनुसार घरांची रचना, नैसर्गिक आपत्तीरोधक घरे, नवनवीन तंत्रज्ञान, इत्यादी बाबींवर यशस्वीपणे लक्ष देण्यात आले आहे.

तसेच शासनाच्या इतर योजना जसे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण, जल जीवन मिशन, प्रधानमंत्री उज्वला योजना, उजाला योजना, सौभाग्य योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान, इत्यादींशी कृतीसंगम करुन घरकुलांच्या लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यात आले आहे.

यासाठी सर्व उपायुक्त (विकास), मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परीषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), गट विकास अधिकारी इ. सर्व ग्राम विकास यंत्रणेचा सक्रिय पुढाकार राहीला. उत्कृष्ट कामासाठी पुरस्कार सुध्दा देण्यात येणार असल्याने त्यांच्या कामाची दखल घेतली जाणार आहे.

'राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण' कार्यालयाने विकसीत केलेल्या **"महा आवास अभियान-ग्रामीण यशोगाथा"** पुस्तिकेस मनापासून शुभेच्छा! "ई-गृहप्रवेश" च्या माध्यमातून सर्व सुविधांनीयुक्त अश्या स्वत:च्या मालकिच्या घरात प्रवेश करणाऱ्या सर्व लाभार्थ्यांच मन:पुर्वक अभिनंदन !

**राजेश कुमार, भा.प्र.से.**

सत्यमेव जयते



**डॉ. राजाराम दिघे**

**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण**

सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे या शासनाच्या धारेणानुसार राज्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण, राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना व या योजनांसाठी पुरक असणाऱ्या पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, शासकीय जागा मोफत उपलब्ध करण्याची योजना, ग्रामीण भागतील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी, सनियंत्रण व मूल्यमापनासाठी राज्य स्तरावर राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण कार्यरत आहे.

राज्यामध्ये मार्च २०२० पासून कोरोना महामारी, अनुषंगीक टाळेबंदी, इ. मुळे ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये शिथीलता आली होती. या पार्श्वभूमिवर राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचा संचालक पदाचा कार्यभार घेतल्यानंतर या योजनांची अंमलबजावणी गतीमान करण्यासाठी मोहीम घेण्याचा विचार मनात होता. यावर मा. अतिरीक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग व मा. मंत्री, ग्राम विकास यांच्याशी चर्चा केली व त्यानुसार महा आवास अभियान ग्रामीणची संकल्पना विकसीत करण्यात आली. त्यामध्ये गतिमानतेबरोबर गुणवत्तावाढीवरही भर दिला आणि 'महा आवास अभियान-ग्रामीण' चा शासन निर्णय दि. १९ नोव्हेंबर २०२० रोजी निर्गमित करण्यात आला.

राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून दिनांक २० नोव्हेंबर २०२० रोजी 'महा आवास अभियान-ग्रामीण' चा राज्यस्तरीय शुभारंभ मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते व मा. मंत्री, ग्राम विकास व मा. राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल यांचे प्रमुख उपस्थितीत राज्यस्तरीय कार्यशाळेद्वारा करण्यात आला. त्यानंतर सर्व भागधारकांची क्षमता बांधणी करण्यासाठी राज्यात विभागस्तरीय, जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय, ग्रामस्तरीय कार्यशाळा आयोजित करून गावांमध्ये ग्रामकृती गटाचे गठन करण्यात आले. गावोगावी लाभार्थी मेळावे आयोजित करून लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी प्रोत्साहीत करण्यात आले.

राज्य स्तरावरून सर्व संबंधीत विभागांशी जसे ग्रामविकास, आदिवासी विकास, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, कामगार, वित्त व नियोजन, इ. तसेच आदिवासी विकास आयुक्तालय, समाज कल्याण आयुक्तालय, इ. कार्यालयांशी भेटी, बैठकांद्वारे समन्वय साधण्यात आला. त्याचप्रमाणे विविध कॉर्पोरेट संस्था, स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था, इ. च्या सक्रिय सहभागासाठी भागीदारी बैठका घेण्यात आल्या व ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात गतीमानता व गुणवत्तावाढीसाठी रिलायन्स फाउंडेशन, हुडको, IIT मुंबई इ. संस्थाशी प्रत्यक्षात भागीदारी करण्यात आली.

अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य स्तरावरून सनियंत्रण व मूल्यमापनासाठी आढावा बैठका, आवास सॉफ्ट व गुगल प्रणालीद्वारे दैनंदिन व साप्ताहिक अहवाल, ई-मेल, दुरध्वनी, वॉट्स ॲप, क्षेत्रीय भेटी, इ. माध्यमातून प्रयत्न केले. विशेषत: मा. मंत्री, ग्राम विकास व मा. अतिरीक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या प्रमुख उपस्थितीत नियमीत व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आढावा बैठका घेण्यात आल्या.

# मनोगत

अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जनजागृतीसाठी प्रिंट मिडीया, इलेक्ट्रॉनिक मिडीया, आऊट डोअर मिडीया, सोशल मिडीया, पारंपारिक मिडीया, आंतरव्यक्ती संवाद, इ. साधनांद्वारे माहिती, शिक्षण व संवादाचे विविध उपक्रमांचा यथोचित अवलंब करण्यात आला. जसे - अभियान घडी पत्रिका, मार्गदर्शक पुस्तीका, पोस्टर, होर्डीग, बॅनर, पॉम्प्लेटस्, स्टँडी, महा आवास त्रैमासिक, इ.

संचालक, ग्रामीण गृहनिर्माण पदाबरोबर मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण ग्रामीण जीवनोन्नती मिशनचा अतिरीक्त पदभार असताना मा. मंत्री, ग्राम विकास व मा. अतिरीक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली "महासमृद्धी महिला सशक्तीकरण अभियान" ची संकल्पना विकसीत करून शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. तसेच सध्या मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन (VSTF) चा अतिरिक्त पदभार असून ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात कॉर्पोरेट संस्थांचा सक्रिय सहभाग घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते ५ जून २०२१ या कालावधीत राबविण्यात आलेल्या 'महा आवास अभियान-ग्रामीण' ला सर्व भागधारकांकडून भरभरून प्रतिसाद मिळाला असून त्यातून राज्यामध्ये मोठे काम उभे राहिले आहे. त्यामध्ये ४९,८४६ भूमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता, ३,६९,०४९ घरकुलांना मंजूरी, ३,८९,९८४ लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरण, ३,१७,२७५ लाभार्थ्यांची घरकुले भौतिकदृष्टया पुर्ण झाली असून ४,७३,१७१ घरकुले प्रगतीच्या विविध टप्प्यांवर आहेत. या व्यतिरिक्त ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाद्वारे ८,८१५ गवंडी प्रशिक्षित झाले असून १३,८१० गवंड्यांचे प्रशिक्षण सुरू आहे. लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी राज्यातील प्रत्येक तालुक्यात आत्तापर्यंत ३२० डेमो हाउसेस उभी राहिली असून लाभार्थ्यांचे आधार सिडींग व जॉबकार्ड मॅपिंगचे काम प्रगतीपथावर आहे.

घरकुल लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजना जसे - महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून रोजगार, स्वच्छ भारत अभियान-ग्रामीण मधून शौचालय, जल जीवन मिशन मधून नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, प्रधानमंत्री उज्वला योजने मधून गॅस जोडणी, सौभाग्य योजने मधून विद्युत जोडणी व राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशन मधून उपजिविकेचे साधन, इ. योजनांचा लाभ देण्यासाठी कृतीसंगमावर लक्ष देण्यात आले. या अभियानातून नाविन्यपुर्ण उपक्रमांद्वारे १,२८६ बहुमजली इमारती, ६२५ गृह संकुले, ६१२ घरकुल मार्ट, ४२,१८० वित्तीय संस्थांव्दारे गृहकर्ज व १,२,२१०४ मुलभूत नागरी सुविधांद्वारे आदर्श घरकुले उभी राहीली याचा आनंद वाटतो. या उत्कृष्ट कार्यासाठी क्षेत्रीय यंत्रणेचा महा आवास पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहेच.

राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात गतिमानतेबरोबर गुणवत्तावाढीसाठी सर्व ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांच्या क्षमता बांधणीसाठी IIT मुंबईद्वारे तांत्रिक प्रशिक्षण देखील सुरू करण्यात आले असून येत्या काळात त्याचा फायदा लाभार्थ्यांपर्यंत पोहचेल असा विश्वास वाटतो.

आज अभियान कालावधीत पूर्ण झालेल्या घरकुलांचा ई-गृहप्रवेश कार्यक्रम मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते व मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. मंत्री, ग्राम विकास, मा. राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल, मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मा. अतिरीक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग व इतर मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत होत आहे याचा आनंद वाटतो.

अभियान कालावधीतील सर्व महत्वांच्या घटनांचा मागोवा या यशोगाथा पुस्तिकेत घेण्यात आला असून अभियानाची फलश्रुती देण्यात आली आहे. या निमित्ताने महा आवास अभियान-ग्रामीणाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व क्षेत्रीय यंत्रणेचे अभिनंदन व पुढील कार्यासाठी शुभेच्छा !

**डॉ. राजाराम दिघे**

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग

# राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण

# महा आवास अभियान-ग्रामीण

यशोगाथा

## अनुक्रमणिका


मार्गदर्शक
मा.श्री. राजेश कुमार (भा.प्र.से.)
अतिरिक्त मुख्य सचिव,
ग्राम विकास व पंचायत राज विभाग

मुख्य संपादक
डॉ. राजाराम दिघे
संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण

प्रबंध संपादक
मंजिरी टकले, उपसंचालक
नीलेश केशव काळे, उपसंचालक
संतोष भांड, सहा. संचालक (लेखा)

कार्यकारी संपादक
संजय घोगळे, सहाय्यक लेखाधिकारी
दिनेश मोवळे, प्रशिक्षण समन्वयक

सहाय्यक संपादक
राम आघाव, परमेश्वर शेलार, तौसिफ सौदागर,
संतोष पानसरे, अनिल काळे, संदिप मुंढे

मुखपृष्ठ मांडणी व सजावट
दिनेश मोवळे,
प्रशिक्षण समन्वयक (माहिती, शिक्षण व संवाद)

प्रकाशक
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
यांचे कार्यालय, ४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४
दूरध्वनी क्र. - ०२२-२७५६१८२४
ईमेल - directoriayruralhousing@gmail.com

संकेतस्थळ
www.pmayg.nic.in
www.mahaawaas.com


"महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास,
२०२२ पर्यंत सर्वांसाठी आवास"


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मान्यवरांचे संदेश<br>१. मा.ना.श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे, मुख्यमंत्री<br>२. मा.ना.श्री. अजित पवार, उपमुख्यमंत्री<br>३. मा.ना.श्री. हसन मुश्रीफ, मंत्री, ग्राम विकास<br>४. मा.ना.श्री. अब्दुल सत्तार, राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल<br>५. मा.श्री. सिताराम कुंटे, भा.प्र.से., मुख्य सचिव<br>६. मा.श्री. राजेश कुमार, भा.प्र.से., अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग<br>७. डॉ. राजाराम दिघे, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे मनोगत | |
| २ | महा आवास अभियान-ग्रामीणची पूर्व तयारी | १ |
| ३ | महा आवास अभियान-ग्रामीणचा राज्यस्तरीय शुभारंभ | ३ |
| ४ | राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील भागधारकांसाठी क्षमता बांधणी कार्यशाळा | ७ |
| ५ | महा आवास अभियान-ग्रामीणच्या प्रचार, प्रसिध्दी व जनजागृतीसाठी माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम | १० |
| ६ | महा आवास अभियान-ग्रामीणच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम | १५ |
| ७ | महा आवास अभियान-ग्रामीणच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध शासकीय विभागांशी समन्वय बैठका | २२ |
| ८ | ग्रामीण आवास योजना गतिमान व गुणवत्तापूर्ण करणेसाठी विविध कॉर्पोरेट संस्थांशी भागीदारी | २६ |
| ९ | ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातगतिमानता व गुणवत्तावाढीसाठी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मदत | ३१ |
| १० | मा. मंत्री, ग्राम विकास यांची अभियानाला मुदतवाढीच्या घोषणा | ३५ |
| ११ | महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत जागतिक महिला दिनी महिला घरकुल लाभार्थींसाठी विशेष कार्यक्रम | ३७ |
| १२ | महा आवास अभियान-ग्रामीणच्या यशस्वीतेसाठी लोकसहभाग | ४० |
| १३ | महा आवास अभियान-ग्रामीण - फलश्रुती | ४८ |
| १४ | उपक्रम निहाय प्रगती अहवाल | ५७ |
| १५ | फोटो गॅलरी | ७७ |
| १६ | मिडिया गॅलरी | ८२ |

# महा आवास अभियान-ग्रामीण

# पुर्वतयारी

# "महा आवास अभियान ग्रामीण" ची पूर्वतयारी



"सर्वांसाठी घरे - २०२२" हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अशा विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येत असून त्यांना पूरक पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, अतिक्रमण नियमानुकूल करण्याची योजना अशा योजनाही राबविण्यात येत आहेत.

संपूर्ण जगात कोराना महामारीच्या जीवघेण्या संकटामुळे जनसामान्यात भितीचे वातावरण असून कोरोना पासून बचाव करण्यासाठी लॉक डाऊन, फिजीकल डिस्टन्सींग व घरात विलगीकरण (होम क्वॉरन्टाईन) या सारख्या उपाययोजना शासनाकडून करण्यात येत आहेत. यामुळे लोकांना घराचे महत्व कळले. कोरोना महामारीमुळे ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामाची प्रगती मंदावली होती. ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामांना गतिमान करण्यासाठी त्याचप्रमाणे घरकुलांच्या कामाची प्रगती फक्त संख्यात्मक न राहता गुणात्मक राहवी, नावीन्यपूर्ण कल्पना अंमलात आणून लाभार्थ्यांना सर्व सुविधायुक्त व नैसर्गिक आपत्तीस सक्षमपणे सामोरे जाणारे घरकुल उपलब्ध करुन द्यावे, अशी संकल्पना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी मा. मंत्री, ग्राम विकास, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, जिल्हा व तालुका स्तरीय अंमलबजावणी यंत्रणा यांच्यापुढे मांडली. यातून उदयास आले **महा आवास अभियान-ग्रामीण**......

डॉ. राजाराम दिघे यांनी घेतलेल्या प्रयत्नाला फलस्वरूप ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि. १९ नाव्हेंबर २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतिमान करण्यासाठी व गुणवत्तावाढीसाठी **"महा आवास अभियान-ग्रामीण"** राबविण्यास मान्यता देण्यात आली.

## महा आवास अभियान ग्रामीणच्या यशस्वीतेसाठी केंद्रीय मंत्र्यांकडून शुभेच्छा



दि. २० नोव्हेंबर २०२० राजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून मा.मंत्री, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री. नरेंद्रसिंग तोमर यांनी व्हिडीओ कॉन्फरन्स व्दारे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या प्रगतीबाबत देशातील सर्व राज्यांची बैठक घेतली. या बैठकीला महाराष्ट्र राज्यातून मा.मंत्री, ग्राम विकास श्री. हसन मुश्रीफ व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे उपस्थित होते.

या बैठकीमध्ये मा.मंत्री, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री. नरेंद्रसिंग तोमर यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण उद्दिष्टपुर्ती बाबत सर्व राज्यांशी चर्चा केली. यावेळी केंद्र व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण आवास योजनांना गतिमान व गुणवत्तापूर्ण आणण्यासाठी महाराष्ट्र राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्यात येत असल्याचे मा.मंत्री, ग्राम विकास श्री.हसन मुश्रीफ यांनी सांगितले. या उपक्रमाबद्दल श्री.नरेंद्रसिंग तोमर यांनी अभियानाच्या यशस्वीतेसाठी राज्याचे मा.मंत्री, ग्राम विकास, श्री. हसन मुश्रीफ यांना शुभेच्छा दिल्या.

# महा आवास अभियान-ग्रामीण

# राज्यस्तरीय शुभारंभ

## ग्रामीण बेघरांसाठी "महा आवास अभियान-ग्रामीण" संपूर्ण राज्यात राबविणार मा.ना.श्री. हसन मुश्रीफ, मंत्री, ग्राम विकास यांची घोषणा



मा. मंत्री, ग्राम विकास श्री. हसन मुश्रीफ यांनी "महा आवास अभियान-ग्रामीण" हे दि. २० नोव्हेंबर, २०२० पासून संपूर्ण राज्यात राबविण्यात येणार असल्याची घोषणा दि.२० नोव्हेंबर, २०२० रोजी पत्रकार परिषदेत केली.

या अभियान कालावधीत ८,८२,१३५ घरकुलांची निर्मिती करून बेघर कुटुंबांना निवारा मिळणार. ग्रामीण गंवडी प्रशिक्षणाच्या माध्यमातून पक्के व दर्जेदार घरांची निर्मिती करणार. केंद्र व राज्य पुरस्कृत विविध घरकुल योजना अंतर्गत सर्वसाधारण क्षेत्राकरीता रू.१.२० लक्ष व डोंगराळ, नक्षलग्रस्त क्षेत्राकरीता रू. १.३० लक्ष अर्थसहाय्य मिळणार आहे. यातून किमान २६९ चौ.फु. घर बांधणे अपेक्षित आहे. या व्यतिरिक्त मनरेगा अंतर्गत ९० दिवसांची अकुशल मजुरी रू.१८,०००/- व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत शौचालयासाठी रू.१२,०००/- अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल. दर्जेदार घरकुलांची निर्मिती करण्यासाठी लाभार्थ्यांना बँकेकडून रूपये ७० हजार पर्यंत गृहकर्ज उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचे मा.मंत्री महोदयांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

अभियानाच्या यशस्वीतेसाठी सर्व शासकीय, निमशासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी, लाभार्थी व जनतेने सक्रीय सहभाग द्यावा, असे आवाहन मा. मंत्री महोदयांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केले.

## "महा आवास अभियान-ग्रामीण" राज्यस्तरीय शुभारंभ




"महा आवास अभियान-ग्रामीण" राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या शुभहस्ते मा.मंत्री, ग्राम विकास श्री. हसन मुश्रीफ व मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल श्री.अब्दुल सत्तार, मा.मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव श्री.आशिषकुमार सिंह, मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, श्री.विकास खारगे, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक डॉ. राजाराम दिघे व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत दि. २० नोव्हेंबर, २०२० रोजी सायंकाळी ४.०० वाजता सह्याद्री अतिथी गृह, मलबार हिल, मुंबई येथे सपन्न झाली.

या राज्यस्तरीय कार्यशाळेला सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी, बँक प्रतिनिधी व मिडीया प्रतिनिधी इ. व्हिडीओ कॉन्फरन्सींगच्या माध्यमातून उपस्थित होते.

या कार्यशाळेमध्ये राज्य व्यवस्थापन

कक्षामार्फत डेमो हाऊसेस मॉडलचे प्रदर्शन भरविण्यात आले असून सह्याद्री अतिथी गृहाच्या मुख्य प्रवेशव्दारा पासून ते मिटींग हॉल पर्यंत विविध ग्रामीण आवास योजनेची माहिती दर्शविणाऱ्या स्टॅण्डीची उभारणी करण्यात आली होती. कार्यशाळेची सुरूवात अभियानाची महती सांगणारा लघुपट प्रदर्शित करण्यात आला. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री, ग्राम विकास व मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल यांनी त्यांच्या भाषणातून उपस्थितांना सक्रीय सहभाग नोंदविणेबाबत आवाहन केले.

अभियानाच्या राज्यस्तरीय शुभारंभीय कार्यशाळेचे प्रास्ताविक व अभियानाचे सादरीकरण संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे यांनी केले. या सादरीकरणात महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्याचे उद्देश, अभियान कालावधीत राबवावयाचे उपक्रम, भागधारकांची क्षमता बांधणी, अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संनियंत्रण व मूल्यमापन, अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणाऱ्यांना व्यक्ती व संस्था यांना देण्यात येणारे पुरस्कार व माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रमाव्दारे अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी राबवयाचे उपक्रम इ. बाबत सविस्तर माहिती डॉ.राजाराम दिघे यांनी सांगितली.




## मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते IEC साहित्याचे प्रकाशन

महा आवास अभियान-ग्रामीण शुभारंभीय कार्यशाळे प्रसंगी मा. मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते मा. मंत्री, ग्राम विकास, मा. राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या कार्यालया मार्फत अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी, प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी तयार करण्यात आलेल्या माहिती, शिक्षण व संवाद (IEC) साहित्याचे प्रकाशन करण्यात आले.

### अभियान घडी पुस्तिका प्रकाशन

"महा आवास अभियान-ग्रामीण" राबविण्याचे उद्देश, अभियान कालावधीत राबवावयाचे उपक्रम, क्षमता बांधणी कार्यक्रम, जन-जागृतीसाठी माहिती, शिक्षण व सवांद कार्यक्रम, अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समित्यांचे गठण, त्यांच्या भूमिका व जबाबदारी, अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांना देण्यात येणारे पुरस्कार व पुरस्कार नामांकन/निवडीचे निकष इ. माहिती अभियानाच्या घडी पुस्तिकेत समाविष्ट करण्यात आली. या अभियान घडी पुस्तिकेचे प्रकाशन मा.मुख्यमंत्री, यांचे शुभहस्ते करण्यात आले.

अभियान घडी पुस्तिका ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील भागदारकांसह, लाभार्थी, ग्रामस्थ व सर्व संबंधित अंमलबजावणी यंत्रणेला मार्गदर्शक आहे.

### अभियान मार्गदर्शक पुस्तिका प्रकाशन

अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी अधिक गतीमान करणे व गुणवत्ता आणणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. अभियान कालावधीत राज्यस्तरा पासून ते क्षेत्रिय पातळीवर अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन करण्यासाठी अभियान मार्गदर्शक पुस्तिकेची निर्मिती करण्यात आली. या मार्गदर्शक पुस्तिकेचे प्रकाशन मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते करण्यात आले.






राज्य व्यवस्थापन कक्षा मार्फत अभियान मार्गदर्शक पुस्तिका व महा आवास त्रैमासिकाचा पहिला अंक सर्व विभागीय आयुक्त कार्यालयास पोहोच करून पुढे त्यांचे वाटप जिल्हा, तालुका व ग्रामस्तरीय सर्व संबंधित यंत्रणेला करण्यात आले.

## अभियान पोस्टर प्रकाशन

"महा आवास अभियान-ग्रामीण" राबविण्याचे उद्देश व अभियान कालावधित राबविण्यात येणारे विविध उपक्रम याबातची माहिती ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील भागधारक, लाभार्थी, इतर संबंधित शासकीय निमशासकीय अधिकारी, पदाधिकारी व सर्व जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्षामार्फत अभियान पोस्टरची निर्मिती करण्यात आली. या अभियान पोस्टरचे प्रकाशन मा.मुख्यमंत्री यांचे शुभहस्ते करण्यात आले.

अभियान पोस्टर्स राज्य स्तरापासून ते ग्राम स्तरापर्यंत सर्व ठिकाणी प्रदर्शित करण्यासाठी सर्व स्तरावर वितरीत करण्यात आले.




## राज्य व्यवस्थापन कक्ष -ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या लोगोचे अनावरण

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना व राज्य पुरस्कृत विविध आवास योजनाच्या प्रभावी अंमलबजावणी व संनियंत्रण करण्यासाठी तसेच इतर राज्य शासनाच्या इतर विभाग व केंद्र शासनाशी समन्वय ठेवण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाची स्थापना करण्यात आली.




संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाची एक ओळख निर्माण व्हावी, याकरीता बोधचिन्ह (Logo) तयार करण्यात आले. या लोगोचे अनावरण मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

## डेमो हाऊसेस मॉडेल प्रदर्शन

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी राज्यातील सर्व पंचायत समितीमध्ये डेमो हाऊस उभारण्यात येणार आहे. राज्यातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करता त्यानुसार राज्यातील सहा विभागाकरीता डेमो हाऊसेसची प्रतिकृती अर्थात डेमो हाऊस मॉडेलचे प्रदर्शन राज्यस्तरीय अभियान कार्यक्रम स्थळी भरवण्यात आले.

याप्रमाणे डेमो हाऊस मॉडेलचे प्रदर्शन भरविण्याच्या तसेच प्रत्येक जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर डेमो हाऊस मॉडेल ठेवण्याच्या सूचना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडून देण्यात आल्या.



## अभियान माहिती, शिक्षण व संवाद साहित्य

"महा आवास अभियान-ग्रामीण" राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळेकरीता अभियान वृत्तपत्र जाहीरात, बॅकड्रॉप, स्टॅण्डी, होर्डींग, पोस्टर, बॅनर, मार्गदर्शक पुस्तिका, घडी पुस्तिका, पॅम्पफ्लेटस, डेमो हाऊस मॉडेल व लघुपट इ. माहिती, शिक्षण व संवाद साहित्य राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयामार्फत निर्मित करण्यात आले होते. राज्यस्तरीय शुभारंभीय कार्यशाळेसाठी या साहित्याचा उपयोग करण्यात आला असून हे सर्व माहिती, शिक्षण व संवाद साहित्य विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृती करीता सर्व स्तरावर उपलब्ध करून देण्यात आले होते.

# महा आवास अभियान-ग्रामीण

# क्षमता बांधणी

# राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील भागधारकांच्या क्षमता बांधणीसाठी कार्यशाळा

महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत राज्यातील सर्व ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील भागधारकांच्या क्षमता बांधणीसाठी अभियान कालावधीत विविध कार्यशाळा, आढावा बैठका, सभा, प्रशिक्षणे, क्षेत्रिय भेटी, लाभार्थी मेळावे, बँक मेळावे, गृहभेटी, ईमेल, पत्रव्यवहार व सोशल मिडीया (व्हॉटस ॲप) सारख्या माध्यमांचा वापर करण्यात आला.

### -: विभागस्तरीय कार्यशाळा :-

राज्यातील सर्व विभागांमध्ये संबंधित विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), अतिरिक्त आयुक्त/उपायुक्त (आदिवासी विकास, सामाजिक न्याय, कामगार) यांचे उपस्थितीत विभागस्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळांना प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प), सहाय्यक आयुक्त (समाज कल्याण), उप जिल्हा कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ), जिल्हा माहिती अधिकारी, गट विकास अधिकारी, विभागीय कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, इ. यांना अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यशाळेचे आयोजन व अभियानाचे सादरीकरण उप आयुक्त (विकास) यांनी केले. सदर कार्यशाळेस राज्यस्तरावरुन राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे अधिकारी निरीक्षक म्हणून उपस्थित होते. या कार्यशाळा फिजीकल डिस्टन्सींग पाळून आणि व्हिडीओ कॉन्फरन्सींग च्या माध्यमातून आयोजित करण्यात आल्या.




### -: जिल्हास्तरीय कार्यशाळा :-

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये मा.पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखाली तसेच मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद यांचे प्रमुख उपस्थितीत आणि मा. खासदार, मा. आमदार, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प), सहाय्यक आयुक्त (समाज कल्याण), उप जिल्हा कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) यांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळांना जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती सभापती, उपसभापती, गट विकास अधिकारी, तहसिलदार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी, तालुकास्तरीय डाटा एन्ट्री ऑपरेटर, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, इ. यांना अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यशाळेचे आयोजन व अभियानाचे सादरीकरण प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) यांनी केले. सदर कार्यशाळेस विभागस्तरावरील अधिकारी हे निरीक्षक म्हणून उपस्थित होते. या कार्यशाळा फिजीकल डिस्टन्सींग पाळून आणि व्हिडीओ कॉन्फरन्सींगच्या माध्यमातून आयोजित करण्यात आल्या.




### -: तालुकास्तरीय कार्यशाळा :-

राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये तालुक्याचे मा.आमदार यांचे अध्यक्षतेखाली तसेच पंचायत समिती सभापती, उपसभापती, जिल्हा परीषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, गट विकास अधिकारी, तहसिलदार

यांच्या उपस्थितीत तालुकास्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळांना तालुक्यातील सर्व सरपंच, ग्रामसेवक, तलाठी, पंचायत समिती कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, इत्यादींना अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यशाळेचे आयोजन व अभियानाचे सादरीकरण गट विकास अधिकारी यांनी केले. सदर कार्यशाळेस जिल्हास्तरावरील संपर्क अधिकारी हे निरीक्षक म्हणून उपस्थित होते. या कार्यशाळा फिजीकल डिस्टन्सींग पाळून आणि व्हिडीओ कॉन्फरन्सींग च्या माध्यमातून आयोजित केल्या.



### -: ग्रामस्तरीय कार्यशाळा :-

राज्यात सर्वत्र गावस्तरावर सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत सदस्य व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रामस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. त्यामध्ये ग्रामसेवक, तलाठी यांनी अभियानाबाबत सखोल मार्गदर्शन केले.

या कार्यशाळाद्वारे अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व लाभार्थी यांना विविध आवास योजनांची माहिती देवून गावातील योजनांच्या गतिमान अंमलबाावणीबाबतचे नियोजन करण्यात आले.

या कार्यशाळेचे आयोजन व अभियानाचे सादरीकरण संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्राम सेवक यांनी केले. सदर कार्यशाळेस तालुका स्तरावरील संपर्क अधिकारी हे निरीक्षक म्हणून उपस्थित होते. या कार्यशाळा फिजीकल डिस्टन्सींग पाळून आणि व्हिडीओ कॉन्फरन्सींग च्या माध्यमातून आयोजित करण्यात आल्या.



### -: ग्राम कृती गटाचे गठन :-

ग्रामस्तरीय कार्यशाळेमध्ये प्रत्येक ग्रामपंचायती मध्ये ग्राम कृती गटाचे (Village Action Group) गठन करण्यात आले. यामध्ये गावातील प्रभावी व्यक्ती, युवक/युवती, इत्यादींचा समावेश केला. या गटा मार्फत अभियानामध्ये गावस्तरावर केल्या जाणाऱ्या व करावयाच्या प्रत्यक्ष उपाय योजनांचा पाठपुरावा करुन अभियानाच्या यशस्वीतेसाठी सक्रीय सहभाग घेतला.

### -: लाभार्थी मेळावे :-

गावोगावी फिजीकल डिस्टन्सींग पाळून लाभार्थ्यांचे मेळावे आयोजित करण्यात आले. या मेळाव्यामध्ये अभियानाच्या उद्दिष्टांबाबत, घरकुल बांधकाम व दर्जाबाबत मार्गदर्शन व प्रोत्साहन देवून अभियान यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.




### -: बँक मेळावे :-

तालुकास्तरावर/गावोगावी फिजीकल डिस्टन्सींग पाळून अथवा व्हिडीओ कॉन्फरन्सींग च्या माध्यमातून बँक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घरासाठी कर्ज घेवू इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांसाठी बँक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्या मध्ये लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी कर्ज उपलब्धतेबाबत मार्गदर्शन व प्रयत्न करण्यात आले.

तालुका स्तरावर गट विकास अधिकारी, तहसिलदार, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते यांनी तर ग्रामस्तरावर सरपंच व ग्रामसेवक यांनी बँक मेळाव्यांचे आयोजन केले.

# महा आवास अभियान-ग्रामीण

# माहिती, शिक्षण व संवाद

# "महा आवास अभियान-ग्रामीण" च्या प्रचार, प्रसिध्दी व जनजागृतीसाठी माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम

## अभियानाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी विविध माहिती, शिक्षण व संवाद साहित्याची निर्मिती

"महा आवास अभियान-ग्रामीण" राज्यस्तरीय शुभारंभीय कार्यशाळेकरीता अभियान वृत्तपत्र जाहीरात, बॅकड्रॉप, स्टॅण्डी, होर्डींग, पोस्टर, बॅनर, मार्गदर्शक पुस्तिका, घडी पुस्तिका, पॅम्पफ्लेटस, डेमो हाऊस मॉडेल व लघुपट इ. IEC साहित्य राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयामार्फत तयार करण्यात आले होते. अभियानासाठी तयार करण्यात आलेल्या माहिती शिक्षण व संवाद साहित्याचा वापर अभियानाच्या राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी करण्यात आला. अभियानाच्या राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळेकरीता तयार करण्यात आलेले सर्व IEC साहित्य विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर होणाऱ्या कार्यशाळांकरीता वापर व्हावा याकरीता सर्व स्तरावर उपलब्ध करून देण्यात आले आहे.




महा आवास अभियान-ग्रामीण या अभियानाची प्रचार व प्रसिध्दी करुन राज्यात अभियानाची जनजागृती व अभियान तळागाळा पर्यंत पोहोचवण्यासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने माहिती, शिक्षण व संवाद उपक्रमांतर्गत अभियाना बाबत व्हिडीओ जाहीराती व जिंगलसची निर्मिती केली आहे. या व्हिडीओ जाहिरातीचे प्रसारण दूरदर्शन व इतर खासगी दूरचित्रवाणी, वृत्त वाहिन्यांवर तर जिंगलसचे प्रसारण आकाशवाणी, एफ. एम. रेडिओ, कम्युनिटी रेडिओ व बस स्थानकांवर संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालयामार्फत करण्यात आहे. या व्हिडीओ जाहिराती व जिंगल्सला खासगी केबल, घंटा गाडी, कार्यशाळा, बैठका, मेळावे, चित्रपट गृह, व्हाटसॲप, फेसबुक, ट्विटर व युट्युब सारख्या सोशल मिडीयाच्या माध्यमातून प्रसार व प्रसिध्दी देणेबाबत जिल्हा व तालुका स्तरीय यंत्रणेला सूचित केले आहे.




अभियान कालावधीत अभियानाच्या प्रसार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी माहिती शिक्षण व संवाद उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये नाशिक जिल्ह्याने अभियानावर व्हिडीओ जाहिरात व जिंगल्स तयार केल्या. तसेच पंचायत समिती शिरोळ येथे तालुका स्तरीय अभियान कार्यशाळे प्रसंगी महा आवास अभियान-ग्रामणची रांगोळी साकारण्यात आली. परभणी जिल्ह्याने अभियानाचे उद्देश, अभियान कालावधीत राबविण्यात येणारे उपक्रम, विविध ग्रामीण आवास योजनांची माहिती दर्शविणाऱ्या चित्ररथाची निर्मिती केली. या चित्ररथाच्या माध्यमातून महा आवास अभियान-ग्रामीण विषयी तळागाळापर्यंत जन-जागृती होण्यास मदत झाली.




"महा आवास अभियान-ग्रामीण" राज्यस्तरीय समारोप कार्यशाळे करीता वृत्तपत्र जाहीरात, बॅकड्रॉप, स्टॅण्डी, महा आवास यशोगाथा पुस्तिका, अभियान फोटो गॅलरी, डेमो हाऊस मॉडेल व लघुपट इ. माहिती, शिक्षण व संवाद साहित्य राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने तयार केले असून त्याचा वापर सदर कार्यशाळेत करण्यात आला.

## अभियानाच्या अंमलबजावणीसाठी मा.मंत्री व मंत्रालयीन अधिकारी यांचेशी बैठका व अभियान प्रचार, प्रसिध्दीसाठी माहिती, शिक्षण व संवाद साहित्याचे वितरण



केंद्र व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना अंमलबजावणीसाठीच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी दि. २० नोव्हेंबर २०२० पासून महा आवास अभियान-ग्रामीण संपूर्ण राज्यात राबविण्यात आले. या अभियानच्या प्रभावी अंमलबजावणी व अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दीसाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे व राज्य व्यवस्थापन कक्षाचे अधिकारी श्री. नीलेश केशव काळे (उपसंचालक), श्रीमती मंजिरी टकले (उपसंचालक) व श्री. संतोष भांड यांनी विविध विभागांच्या मा.मंत्री व मंत्रालयीन अधिकाऱ्यांशी बैठका घेतल्या.

अभियानाची प्रभावी अंमलबजावणी व प्रचार, प्रसिध्दीसाठी राज्याचे मा.मंत्री, महसूल, श्री.बाळासाहेब थोरात, मा.मंत्री, ग्राम विकास, श्री.हसन मुश्रीफ, मा.मंत्री, आदिवासी विकास, श्री.के.सी. पाडवी, मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, श्री. धनंजय मुंडे, मा.मंत्री, अल्पसंख्याक विकास व औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता, श्री. नवाब मलीक व मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल, श्री.अब्दुल सत्तार यांचेशी चर्चा केली. त्याचप्रमाणे राज्याचे मा. मुख्य सचिव, मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, मा.अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल, मा.प्रधान सचिव, वित्त विभाग, मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मा. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व मा. सचिव, आदिवासी विकास विभाग यांचेशी बैठका झाल्या.

या बैठकामध्ये अभियानाचे उद्देश, अभियान राबविण्यात येणारे उपक्रम, अभियान यशस्वीसाठी विविध विभागांचा सहभाग, अभियानातील आर्थिक व भौतिक प्रगती बाबत चर्चा करण्यात आली. अभियानाची प्रचार, प्रसिध्दी व अभियाना विषयी सविस्तर माहिती मिळावी याकरीता अभियानाचा शासन निर्णय, अभियानाची मार्गदर्शक पुस्तिका, अभियानाचे पोस्टर, अभियानाची घडी पुस्तिका व ग्रामीण गहनिर्माण क्षेत्रातील घडामोडीचा मागोवा घेणारे राज्य व्यवस्थापन कक्षाचे महा आवास त्रैमासिक इत्यादी साहित्य सर्व सन्माननिय मा. मंत्री व सर्व सन्माननिय मंत्रालयीन अधिकारी यांना दिले.





## मा. मंत्री, ग्राम विकास यांच्या शुभहस्ते महा आवास त्रैमासिकाचे प्रकाशन

ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील घडामोडीचा आढावा घेणारे व ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नावीन्यपूर्ण उपक्रमांना प्रसिध्दी देणारे महा आवास त्रैमासिक संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालयाकडून प्रकाशित करण्यात येते. माहे जुलै २०२० ते सप्टेंबर २०२० याकालावधीतील त्रैमासिकाचे पहिल्या अंकाचे प्रकाशन मा.मुख्यमंत्री, श्री.उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

दि. २० नोव्हेंबर २०२० रोजी महा आवास अभियान-ग्रामीणचा राज्यस्तरीय शुभारंभ मा. मुख्यमंत्री, श्री. उध्दव ठाकरे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. महा आवास त्रैमासिक माहे आक्टोबर २०२० ते डिसेंबर २०२० याकालावधीच्या दुसऱ्या अंकाचे प्रकाशन दि. २३ फेब्रुवारी २०२१ रोजी पार्टनरशिप व राज्यस्तरीय आढावा बैठकीत मा.ग्राम विकास मंत्री श्री. हसन मुश्रीफ यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या दुसऱ्या अंकात अभियानाचे उद्देश, अभियानात राबवावयाचे उपक्रम, अभियान यशस्वीतेसाठी मान्यवरांचे संदेश, भागधारकांची क्षमता बांधणीसाठी कार्यशाळा, आढावा बैठका, बहुमजली इमारती व गृहसंकुलांचे डिजाईन्स, राबविण्यात आलेले माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम, अभियान कालावधीत राबविण्यात आलेले उपक्रम, यशोगाथा, विविध ग्रामीण आवास योजनांची सद्यस्थिती, केंद्र व राज्य शासनाला दिलेले इनपुट व इतर ग्रामीण गृहनिर्माण क्षत्रातील घडोमोडींची माहिती प्रकाशीत करण्यात आली.

माहे जानेवारी २०२१ ते मार्च २०२१ या कालावधीच्या तीसऱ्या अंकाचे प्रकाशन दि.२१ मे २०२१ रोजी राज्यस्तरीय आढावा बैठकीमध्ये मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.राजेश कुमार यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या अंकात अभियान कालावधीत अभियान यशस्वीतेसाठी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.मंत्री, ग्रामविकास, मा.राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, मा.मुख्य सचिव व मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांचे लोकप्रतिनिधी व शासकीय यंत्रणेला सक्रीय सहभाग देणेबाबतचे आवाहनपर पत्र, राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी, लाभार्थी व ग्रामस्थ यांनी राबविलेले विविध उपक्रम, आढावा बैठकी, क्षेत्रिय भेटी, विविध शासकीय विभागांशी समन्वय बैठका, विविध कॉर्पोरेट व शैक्षणिक संस्थाशी भागीदारी बैठका, भागीदारीची घोषणा, अभियानाला मुदतवाढ, क्षमता बांधणीसाठी प्रशिक्षण, क्षमता बांधणी कार्यशाळा, जागतिक महिला दिना निमित्त राबविण्यात आलेले विविध उपक्रम, शासकीय अधिकारी, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, लाभार्थी व ग्रामस्थ यांचा अभियान यशस्वीतेसाठी सहभाग, माहिती, शिक्षण व संवाद उपक्रमांतर्गत व्हिडीओ जाहिराती, जिंगल्सची निर्मिती व प्रसारण, राबविण्यात आलेले नाविन्यपूर्ण उपक्रम, केंद्र व राज्य शासनाल दिलेले इनपुट, यशोगाथा, विविध आवास योजनांची सद्यस्थिती व ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात घडलेल्या विविध घडामोडींचा मागोवा घेण्यात आला.

याप्रसंगी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे, राज्य व्यवस्थापन कक्षाचे श्री. निलेश काळे (उपसंचालक), श्रीमती मंजिरी टकले (उपसंचालक) व सहा. संचालक (लेखा) श्री. संतोष भांड उपस्थित होते. त्यासोबत दूरदृष्य प्रणालीव्दारे (VC) सर्व विभागीय आयुक्त कार्यालयाचे उप आयुक्त (विकास), जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी व इतर संबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.





## मा. मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते घरकुल मार्ट व विक्री केंद्र (Coop Shop) लोगोचे अनावरण

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक डॉ. राजाराम दिघे यांनी दि. १५ जानेवारी, २०२१ रोजी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती मिशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी या पदाचा पदभार स्विकारला. पदभार स्विकारताच त्यांनी "महा आवास अभियान-ग्रामीण" च्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती मिशनच्या कार्यक्रमांची अंमलबजावणी गतीमान करण्यासाठी व त्यामध्ये गुणवत्ता आणण्यासाठी "महासमृध्दी महिला सक्षमीकरण अभियान" राज्यात राबविण्याचा संकल्प केला. राष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून दि. ०८ मार्च २०२१ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला.

अभियान कालावधीत राज्यातील सर्व ग्रामीण आवास योजनांच्या कामांना गती देण्यासाठी व सर्व घरकुल बांधकाम साहित्य एका छताखाली मिळण्यासाठी राज्यात महिला बचत गटांच्या सहभागाने **घरकुल मार्ट** सुरू करण्यात आले आहे.

संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालयाच्या संकल्पनेतून उभारण्यात आलेल्या घरकुल मार्टची बाजारपेठ व जनतेत वेगळी ओळख निर्माण व्हावी व राज्यात त्यांचा एक ब्रॅन्ड तयार व्हावा याकरीता संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालयाने घरकुल मार्ट करीता लोगोची निर्मिती केली आहे.

अभियान कालावधीत घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक पंचायत समिती आवारात डेमो हाऊसची उभारणी करण्यात येत आहे.

या पूर्ण झालेल्या डेमो हाऊसचा उपयोग ग्रामीण जनतेला रोजगार निर्मितीसाठी व्हावा. राज्यातील सर्व ग्रामीण आवास योजनेतील लाभार्थ्यांच्या/महिला बचत गटांच्या उत्पादनांना विक्रीसाठी व्यासपीठ मिळण्यासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालयाच्या संकल्पनेतून डेमो हाऊसेस मध्ये **विक्री केंद्र (Co-op Shop)** सुरू करण्याचा अभिनव उपक्रम राज्यात सुरू केला आहे.

या विक्री केंद्र (Co-op Shop) ची बाजारपेठ व जनतेमध्ये एक वेगळी ओळख व्हावी व राज्यात त्यांचा एक ब्रॅन्ड तयार व्हावा याकरीता संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालयाने विक्री केंद्र (Co-op Shop) लोगोची निर्मिती केली आहे.

विक्री केंद्र (Co-op Shop) व घरकुल मार्ट या दोन्ही लोगोचे अनावरण जागतिक महिला दिनी ८ मार्च २०२१ रोजी "महासमृध्दी महिला सक्षमीकरण अभियान" राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी राज्याचे मा.मुख्यमंत्री, श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या शुभहस्ते व मा. उपमुख्यमंत्री, श्री. अजित पवार, मा.मंत्री, ग्राम विकास, श्री.हसन मुश्रीफ, मा.मंत्री, महिला व बालविकास, श्रीमती यशोमती ठाकुर, मा. राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल श्री. अब्दुल सत्तार, मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री. राजेश कुमार, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे, राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती मिशनचे अधिकारी व आदी मान्यवरांच्या उपस्थित करण्यात आले.






# महा आवास अभियान-ग्रामीण

# संनियंत्रण व मूल्यमापन

# "महा आवास अभियान-ग्रामीण" च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम

## अभियानाच्या अंमलबजावणीसाठी मा.मंत्री, ग्राम विकास यांच्या अध्यक्षतेखाली व मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या उपस्थितीत बैठका

मा. मंत्री, ग्राम विकास, श्री.हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली व मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.राजेश कुमार, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे व राज्य व्यवस्थापन कक्षाचे अधिकारी श्रीमती मंजिरी टकले, श्री.नीलेश केशव काळे व संतोष भांड यांच्या उपस्थितीत दूरदृष्य प्रणालीव्दारे (VC) "महा आवास अभियान-ग्रामीण" अंतर्गत केंद्र व राज्य पुरस्कृत विविध आवास योजनांच्या कामाची प्रगती व अभियान कालावधीत राबविण्याच्या उपक्रमांचा आढावा बैठका घेतल्या.

"महा आवास अभियान-ग्रामीण" अंतर्गत
**'दि. १५ डिसेंबर २०२० घरकुल मंजूरी दिवस'** व **'२० डिसेंबर २०२० प्रथम हप्ता वितरण दिवस'**
म्हणून घोषित
**- मा.ना. श्री. हसन मुश्रीफ, मंत्री, ग्राम विकास**

या बैठकांना दूरदृष्य प्रणालीव्दारे (VC) राज्यातील सर्व विभागीय उप आयुक्त (विकास), जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी व इतर संबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक डॉ. राजाराम दिघे यांनी अभियानातील समाविष्ट १० उपक्रमांच्या अनुषंगाने जिल्हा निहाय आढावा घेतला. तसेच तिसरा हप्ता वितरीत केलेली घरकुल बांधकाम त्वरित पूर्ण करणे, पंचायत समितीमध्ये डेमो हाऊस बांधकाम, डेमो हाऊस जागा उपब्धता, डेमो हाऊस बांधकामकरीता तांत्रिक अधिकारी नेमणूक व पहिला हप्ता वितरीत करून १२ महिने पूर्ण झालीत अशी घरकुले पूर्ण करणे या विषयांवर चर्चा करण्यात आली.

अभियान काळात ८ लक्ष घरकुले पूर्ण करावयाची असल्याने प्रथम १०० टक्के मंजूरी व पहिला हप्ता वितरणावर लक्ष केंद्रीत करणे. अतिक्रमण नियमानुकूल करणे व लाभार्थ्यांना घरकुलांकरीता जागा उपलब्धते बाबत कार्यवाही करणे. घरकुल बांधकामात महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर असला पाहिजे याकरीता अभियान कालावधित सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उद्देशपुर्तीकडे लक्ष केंद्रीत करावे व खासदार, आमदार व लोकप्रतिनिधीचा सहभाग घ्यावा असे मा.मंत्री महोदयांनी बैठकीला उपस्थितांना सांगितले. तसेच अभियान कालावधीत कामात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल असेही मा.मंत्री महोदयांनी स्पष्ट केले.

अभियानाच्या उपक्रमांवर लक्ष केंद्रीत करून अभियान कालावधीत जास्तीत जास्त घरकुलांची निर्मिती करावी. याकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रकल्प संचालक व गट विकास अधिकारी यांच्या नियमित बैठका घ्याव्यात. अभियान कालावधीत प्रती दिन घरकुल बांधकामाचे उद्दिष्ट निश्चित करून त्यानुसार त्याचे संनियंत्रण करण्यात यावे, अशा सूचना मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी उपस्थितांना दिल्या. महसूल विभागाशी निगडीत जागा उपलब्धता, वाळू उपलब्धता, अतिक्रमण नियमानुकूल करणे व बक्षिस पत्र या विषयांवर महसूल विभागाशी चर्चा सुरू असल्याचे मा.






## अभियान अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली बैठका




राज्यात महा आवास अभियान-ग्रामीणची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन करण्यासाठी राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व ग्राम स्तरावर अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समित्यांचे गठण करण्यात आले आहे. राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियत्रण व मूल्यमापन समितीचे अध्यक्ष मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग, श्री. राजेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समितीचे सदस्य, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृह निर्माण कार्यालयाचे संचालक, राज्य व्यवस्थापन कक्षाचे अधिकारी व जिल्हास्तरीय अंमलबजावणी यंत्रणा यांच्या बैठकांचे आयोजन अभियान कालावधीत करण्यात आले.

राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियत्रण व मूल्यमापन समितीच्या बैठकीला संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, सह सचिव, वित्त विभाग, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सह सचिव (कामगार) ऊद्योग ऊर्जा व कामगार विभाग, उप सचिव (केंद्र योजना), ग्राम विकास व पंचायतराज विभाग, अवर सचिव, आदिवासी विकास विभाग, सचिव तथा मु.का.अ., महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कार्यकारी मंडळ, राज्य व्यवस्थापन कक्षाचे उप संचालक (प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण), उप संचालक (राज्य योजना), सहाय्यक संचालक (लेखा), कक्ष अधिकारी, ग्राम विकास विभाग हे उपस्थित होते.



या बैठकीत संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन प्रास्ताविक सादर केले. त्याचप्रमाणे राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्याबाबतची पार्श्वभूमी बैठकीत स्पष्ट करण्यात आली. राज्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांची भौतिक, आर्थिक प्रगती व अभियान कालावधीत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती बैठकीत सादर करण्यात आली.

त्याचप्रमाणे महा आवास अभियान-ग्रामीण, VSTF व महासमृध्दी महिला सक्षमीकरण अभियान बाबत बैठक घेण्यात आली. या बैठकीला राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक डॉ. राजाराम दिघे उपस्थित होते.

या बैठकीमध्ये महा आवास अभियान-ग्रामीणच्या माहिती, शिक्षण व सवांद उपक्रमांतर्गत राज्य व्यवस्थापन कक्षाने निर्मिती केलेल्या अभियानाच्या व्हिडीओ जाहिराती व जिंगल्सला टि.व्ही., रेडीओ व बस स्थानकांवर प्रसिध्दी देणेबाबत चर्चा करण्यात आली. तसेच अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांची मुलाखत जय महाराष्ट्र डी.डी.

सह्याद्री व दिलखुलास आकाशवाणीवर प्रसारित करणेकामी तारिख व वेळ निश्चित करण्यात आली.

त्याचप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत घरकुलांची निर्मितीसाठी लाभार्थ्यांना शेवटचा हप्ता वितरीत करतांना इलेक्ट्रीफीकेशनसाठी अतिरिक्त रक्कम रू. १०,०००/- देणेबाबत केंद्र शासनाला द्यावयाच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. घरकुल बांधकाम करतांना लाभार्थ्यांना वाळू उपलब्धता, जागा उपलब्धता व अतिक्रमण नियमानुकूल करणे या महसूल विभागाकडील मुद्यांवर चर्चा करण्यात आली. अहमदनगर जिल्ह्यातील घरकुल बांधकामासबंधी मुद्यांवर चर्चा करण्यात आली.

महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत विविध ग्रामीण आवास योजनांच्या कामांना गतिमान करून गुणवत्तापूर्ण घरकुलांची निर्मिती करण्यात आली. अभियानाची यशस्वी वाटचाल अंतिम टप्प्यात असल्याने अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या १० उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी व ५ जून २०२१ रोजी महा आवास अभियान-ग्रामीण च्या समाप्ती निर्मित्त राज्यस्तरीय कार्यशाळा व ई-गृह प्रवेशाबाबत चर्चा करणेसाठी मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या उपस्थित बैठक संपन्न झाली.

या बैठकीला दूरदृष्य प्रणालीव्दारे (VC) राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी यांच्यासह राज्यातील सर्व विभागीय उप आयुक्त (विकास), जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, जिल्हा परिषदेचे सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) व इतर संबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या १० उपक्रमांचा आढावा घेतला. तसेच अभियान समारोपीय कार्यक्रमाची रूपरेषा व ई-गृह प्रवेश याबाबत सविस्तर माहिती दिली. अभियान कालावधीत राज्यात घरकुल मार्टला अपेक्षेपेक्षाही जास्त प्रतिसाद मिळाला असून त्याच प्रमाणे पूर्ण झालेल्या डेमो हाऊसेस मध्ये कॉप शॉप सूरू करून त्यावर कॉप शॉप व घरकुल मार्ट लोगो लावण्याचे आवाहन डॉ. राजाराम दिघे यांनी उपस्थितांना केले.

अभियानाच्या यशस्वीतेसाठी सर्वांनी सक्रीय सहभाग दिल्याबद्दल मा. अतिरिक्त मुख्य संचिव यांनी सर्व उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. तसेच अभियान समारोप कार्यक्रम व ई-गृह प्रवेशा बाबत मार्गदर्शन केले. अभियान कालावधीत ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात अधिक गतिमानतेने व गुणवत्तापूर्ण काम झाले असून महा आवास अभियान-ग्रामीण मुळे पावसाळ्यापूर्वी गरिब, बेघर, भूमीहीन लाभार्थ्यांचे पक्क्या घरकुलाचे स्वप्न पूर्ण झाले असल्याचे सांगितले.



## अभियानाची अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे विविध उपक्रम

संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालया मार्फत केंद्र व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण आवास योजना राबविण्यात येतात. "सर्वांसाठी घरे २०२२" हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने "महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास, २०२२ पर्यंत सर्वांसाठी आवास" या धोरणाचा अवलंब करून राज्यात ग्रामीण गृहनिर्माण योजना अभियान स्वरूपात राबविण्यात येत आहे. याच संकल्पनेतून राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात सुरू असलेल्या कामास अधिक गतिमान व गुणवत्तावाढीसाठी "महा आवास अभियान-ग्रामीण" राबविण्यात आले.

कोरोना महामारीच्या संकटामुळे संपूर्ण देशात लॉक डाऊन आणि कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी शासनाकडून विविध निर्बंध लावण्यात आले. अशा परिस्थितीत महा आवास अभियान-ग्रामीण यशस्वी करण्याचे आव्हान संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालयाने स्विकारले. मा.मंत्री, ग्राम विकास यांचे बेघर, गरिब व भूमीहीन




लाभार्थ्यांना अभियान कालावधीत ८ लाख घरकुले देण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती मंजीरी टकले (उपसंचालक), श्री. नीलेश केशव काळे (उपसंचालक), श्री. संतोष भांड (सहा. संचालक (लेखा)), संजय घोगळे, श्री. राम आघाव, श्री. अनिल काळे, श्री. संतोष पानसरे, श्री. परमेश्वर शेलार, श्री. संदीप मुंढे, श्री. मायकल जॉन व श्री.दिनेश मोवळे यांनी प्रयत्नाची पराकाष्ठा केली.

अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडून विभागनिहाय Whats App Group तयार करण्यात आले. या ग्रृपमध्ये राज्यस्तरावरील सर्व अधिकारी, विभागस्तरावरील उपायुक्त (विकास), सहाय्यक आयुक्त (विकास), जिल्हास्तरावरील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, जिल्हा कार्यालयाचे संबंधित अधिकारी, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व तालुकास्तरावरील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश करण्यात आला. या ग्रृपच्या माध्यमातून ग्रामस्तरा पासून ते राज्यापर्यंतच्या घडामोडींचा प्रतिदिन आढावा घेण्यात आला. याकरीता राज्य व्यवस्थापन कक्षा कडून अभियानाची प्रगती दर्शविणारे Daily & Weekly Report टाकण्यात आले.

| | T | A | R |
|---|---|---|---|
| भूमिहीन लाभार्थी | 110157 | 41765 | 67238 |
| बहुमजली इमारत | 351 | 886 | -535 |
| गृहसंकूल उभारणे | 351 | 193 | 158 |
| घरकूल मार्ट | 351 | 351 | 0 |
| गृहकर्ज | 35932 | 2172 | 33760 |
| मुलभूत सुविधांद्वारे आदर्श घरकुले | 35932 | 19351 | 16581 |
| डेमो हाऊस | 351 | 215 | 136 |
| ग्रामीण गवंडी प्रशिक्षण | 22020 | 3144 | 14437 |
| सौभाग्य योजना | 1565670 | 323113 | 1242557 |
| स्वच्छ भारत मिशन | 1565670 | 641136 | 924534 |
| जल जीवन मिशन | 1565670 | 470829 | 1094841 |
| उज्वला योजना | 1565670 | 350945 | 1214725 |
| महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनज्ञोती अभियान | 1565670 | 348707 | 1216963 |
| MGNREGA Total Man-days | 140910300 | 40784552 | 100125748 |

| भूमिपूजन व गृहप्रवेश | |
|---|---|
| भूमिपूजन | गृहप्रवेश |
| 2579 | 3272 |

अभियान कालावधीत विविध आवास योजनांतर्गत घरकुलांचे बांधकामाचे फोटो, डेमो हाऊसेस बांधकामाचे फोटो, क्षेत्रिय भेटी व बैठका, वृत्त पत्रातील बातम्या तसेच क्षेत्रिय पातळीवरील आवास योजनांसंबंधित अडचणी बाबतची माहिती टाकण्यात आली. यामुळे ग्रामीण आवास योजनेंच्या सर्व भागधारकांशी समन्वय ठेवता आला. त्याचप्रमाणे राज्यस्तरीय आढावा बैठका व महत्वाच्या सूचना या ग्रृपच्या मदतीने देण्यात आल्यात. तसेच महत्वपूर्ण माहितीचे देवाणघेवाण करण्यासाठी ईमेल, भ्रमणध्वनी व दुरध्वनीचाही वापर करण्यात आला.

अभियान कालावधीत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामीण आवास योजनेंच्या अंमलबजावणी यंत्रणेच्या दूरदृष्य प्रणालीव्दारे (VC) नियमित विभागनिहाय आढावा बैठका घेण्यात आल्या. या बैठकीमध्ये महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत राबविण्यात येणारे उपक्रम व विविध ग्रामीण आवास योजनांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला.

"महा आवास अभियान- ग्रामीण" राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा नियोजन, अभियानाची अंलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन, अभियान समारोप कार्यशाळा नियोजन याकरीता संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली राज्य व्यवस्थापन कक्षातील



अधिकारी/कर्मचारी यांच्या उपस्थितीत नियमित साप्ताहिक बैठकांचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकामध्ये महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत योजनांची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन करणे, क्षमता बांधणी, माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम, विविध शासकीय कार्यालयाशी समन्वय या विषयांवर चर्चा करण्यात आली. तसेच कक्षातील कर्मचाऱ्यांच्या कामाचा आढावा घेऊन प्रलंबित कामाचा निपटारा करणे, विविध बैठकांचे नियोजन करणे इत्यादी बाबत सूचना देण्यात आल्या. राज्यस्तरावरून क्षेत्रिय पातळीवर अभियानाचे संनियंत्रण व मूल्यमापन करण्यासाठी ६ विभागकरीता राज्यस्तरीय संपर्क अधिकारी नेमणूक करण्यात आली. निधीची उपलब्धतता आणि नियोजन इत्यादी बाबत मार्गदर्शन व चर्चा करण्यात आली.

महा आवास अभियान-ग्रामीणची प्रभावी अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी अमरावती, औरंगाबाद, नाशिक, नागपूर, पुणे व कोकण विभागातील विविध जिल्ह्यांचा दौरा केला. या दौरा कार्यक्रमा दरम्यान डॉ. राजाराम दिघे यांनी विभागीय आयुक्त, उपायुक्त (विकास), जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक यांचेशी अभियानाची प्रगती व विविध ग्रामीण आवास योजनांची प्रगती बाबत चर्चा केली. तसेच विविध जिल्ह्यात व तालुक्यातील पंचायत समितींमध्ये जिल्हा व तालुकास्तरीय यंत्रणेचे संबंधित अधिकारी/कर्मचारी, गट विकास अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते व ग्रामसेवकांच्या आढावा बैठका घेतल्या.

डॉ. राजाराम दिघे यांनी त्यांच्या क्षेत्रिय भेटी दरम्यान अभियान कालावधीत विविध पंचायत समितीच्या आवारातील डेमो हाऊसेसची पहाणी केली. तसेच विविध ग्रामपंचायतींना भेट देवून घरकुल मार्ट,



बहुमजली इमारती, गृहसंकुल, पूर्ण झालेल्या व बांधकाम प्रगतीत असलेल्या घरकुलांची पहाणी केली. तसेच घरकुल लाभार्थ्यांना विविध ग्रामीण आवास योजना, वाळू उपलब्धता,जागा उपलब्धता, बहुमजली इमारती, गृहसंकुल व इतर घरकुल बांधकामासंबंधीत बाबींवर घरकुल लाभार्थी व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. तसेच अभियान कालावधीत जास्तीत जास्त घरकुलांची निर्मिती करण्याचे आवाहन सर्व अंमलबजावणी यंत्रणेला केले.



त्याचप्रमाणे अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी राज्यस्तरीय नेमण्यात आलेल्या विभागीय संपर्क अधिकाऱ्यांनी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे उपसंचालक श्री. निलेश काळे यांनी नागपूर विभाग, उपसंचालक श्रीमती मंजिरी टकले यांनी अमरावती विभाग, राज्य समन्वय श्री. राम आघाव यांनी औरंगाबाद विभाग, सह संचालक (लेखा) श्री. संतोष भांड यांनी पुणे विभाग, सहाय्यक लेखाधिकारी श्री.







संजय घोगळे यांनी कोकण विभाग व कार्यकारी अभियंता श्री. संतोष पानसरे यांनी नाशिक विभागा मधील असमाधानकारक प्रगती असणाऱ्या जिल्ह्यांचा दौरा केला.

या दौरा कार्यक्रमा दरम्यान राज्यस्तरीय अधिकाऱ्यांनी जिल्हास्तरावर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक यांच्या उपस्थीत संबंधित जिल्हास्तरीय अधिकारी, कर्मचारी, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, विभागीय प्रोग्रामर, जिल्हा प्रोग्रामर, डाटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते व इतर सबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या अभियान कालावधीत ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रगती बाबत बैठका घेतल्या.

या दौरा कार्यक्रमा दरम्यान ग्राम पंचायतीना भेटी देवून पूर्ण झालेले व प्रगतीत असलेल्या घरकुलांची पहाणी केली. ग्रामस्थांना ग्रामीण गृहनिर्माण योजना विषयी मार्गदर्शन केले. घरकुल मार्ट व पंचायत समिती आवारातील डेमो हाऊस बांधकामाची पहाणी केली. तेसच जिल्हा, तालुका, ग्रामस्तरीय यंत्रणेचे अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ व घरकुल लाभार्थ्यांना अभियान कालावधीत राबवावयाचे उपक्रम व विविध आवास योजनांबाबत मार्गदर्शन केले.





## अभियान कालावधीत ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण घरकुलांच्या निर्मितीसाठी गवंडी प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांच्या साप्ताहिक आढावा बैठका

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमांच्या आढावा बैठका मा.संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे यांनी घेतल्या. या बैठकांना गंवडी प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेचे पदाधिकारी तसेच राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकांमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. तसेच आभियानात राबविण्यात येत असलेल्या डेमो हाऊस या उपक्रमाबाबत संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना थोडक्यात माहिती दिली.

ग्रामीण गंवडी प्रशिक्षण विहीत मुदतीत पूर्ण करणे, संस्थाचे अधिकारी/ पदाधिकारी यांनी प्रत्यक्षात क्षेत्रीय भेट देवून अपूर्ण व मंजूरी दिलेली घरकुले जलद गतीने पूर्ण करणे, प्रशिक्षित गवंडयांचे मुल्यांकन सी. एस. डी. सी. आय. मार्फत करणे, गवंडी प्रशिक्षणाचे काम गतिमान व गुणवत्तापूर्ण करणे, लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम करणेसाठी मार्गदर्शक ठरेल असे एक डेमो हाऊस प्रत्येक पंचायत समिती आवारात निर्मितीचे काम संस्थामार्फत करणे या विषयी चर्चा करण्यात आली. तसेच या कार्यक्रमाच्या अंमलबजावणी मध्ये येणाऱ्या अडीअडचणींबाबत सविस्तर चर्चा होऊन या कार्यक्रमाला गती देण्याच्या सूचना देण्यात आल्या.



# महा आवास अभियान-ग्रामीण

# समन्वय

# अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध शासकीय विभागांशी समन्वय बैठका

## अभियानाची प्रभावी अंमलबजावणीसाठी, निधी उपलब्धता व घरकुल लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी विविध शासकीय विभागांशी समन्वय बैठका

राज्यात संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालयाकडून अभियान कालावधीत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण आवास योजनांची प्रभावी अंमलबजावणी व निधीची उपलब्धता करण्यासाठी अर्थसहाय्य करणाऱ्या संबंधित विभागांशी समन्वय बैठका करण्यात आल्या. त्याचप्रमाणे अभियान कालावधीत विविध शासकीय योजनांशी कृतिसंगम करून लाभार्थ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून रोजगार व स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण मधून शौचालय देणे, जल जीवन मिशन मधून नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे, प्रधानमंत्री उज्वला योजने मधून गॅस जोडणी देणे, सौभाग्य योजने मधून विद्युत जोडणी देणे, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियाना मधून उपजिविकेचे साधन देणे याकरीता विविध विभागांशी बैठका करण्यात आल्या. यामध्ये

### ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या ग्रामीण आवास योजने बाबत बैठका

मा.सचिव, मा.अतिरिक्त सचिव, व मा.महासंचालक ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सींग व्दारे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या आढावा बैठका घेतल्या. या बैठकांना महाराष्ट्र राज्यातून संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे व कक्षातील अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुलांच्या उद्दिष्टा प्रमाणे घरकुलांना मंजूरी देणे व अपूर्ण घरकुले तात्काळ पूर्ण करणे.



कायम स्वरुपी यादीमधील (PWL) मधील या लाभार्थ्यांकडे बांधकामासाठी जागा उपलब्ध करून घरकुले पूर्ण करणे. Awaas+ मधून अपात्र कुटुंबांची नावे कमी करणे. इंदिरा आवास योजना अंतर्गत अपूर्ण घरकुले पूर्ण करणे. आधार सिडींग पूर्ण करणे व महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत विविध आवास योजनांची प्रगती या विषयांवर चर्चा करण्यात आली.

### ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार कार्यालयाचे सल्लागार यांचा मुंबई दौरा

श्री. दिपांशू यादव, सल्लागार ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी दि.२१/१२/२०२० रोजी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक, अधिकारी व कर्मचारी यांचेशी गृहनिर्माण योजनांच्या प्रगती व महा आवास अभियान-ग्रामीण विषयी चर्चा केली.

दुपारच्या सत्रात श्री. दिपांशू यादव व श्री. राम आघाव यांनी जिल्हा ग्रामीण विकास कार्यालय, ठाणे येथे ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा आढावा घेतला. तसेच जिल्हास्तरावर आवास सॉफ्ट सबंधीत तांत्रिक अडचणी बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.



### मा. समाज कल्याण आयुक्तांशी बैठका

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक डॉ.राजाराम दिघे यांनी पुणे येथे मा.आयुक्त, समाज कल्याण श्री.प्रशांत नारनवरे यांची भेट घेतली. या भेटी दरम्यान समाज कल्याण विभागाकडील रमाई आवास योजनेच्या आर्थिक व भौतिक प्रगतीबाबत चर्चा करण्यात आली. तसेच महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत राबविण्यात येणारे

उपक्रम, भागधारकांचा सहभाग व अभियान यशस्वितेसाठी नियोजन याबाबतची माहिती डॉ.राजाराम दिघे यांनी दिली.

डॉ.राजाराम दिघे यांनी समाज कल्याण विभागातील सर्व स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांनी अभियानात सक्रीय सहभागी होऊन अभियान यशस्वी करणे बाबत आवाहन करण्याची विनंती मा.आयुक्त समाज कल्याण श्री.प्रशांत नारनवरे यांना केली.



## मा. प्रधान सचिव, सचिव व आयुक्त आदिवासी विकास विभाग यांच्या बैठका

"महा आवास अभियान- ग्रामीण" ची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण, अभियान कालावधीत राबविण्यात येणाऱ्या आदिवासी विकास विभाग अर्थसहाय्यीत ग्रामीण आवास योजना व विविध घरकुल योजनांच्या प्रगतीबाबत राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक डॉ. राजाराम दिघे यांनी आदिवासी विकास विभागाचे मा.प्रधान सचिव, मा. सचिव, श्री. अनुप कुमार यादव, आदिवासी विकास आयुक्तालयाचे अतिरिक्त आयुक्त श्री.विकास पानसरे व आदिवासी विकास विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचेशी डॉ. राजाराम दिघे यांनी आदिवासी विकास विभाग अर्थसहाय्यीत आदिम, शबरी व पारधी या आवास योजनांच्या आर्थिक व भौतिक प्रगती बाबत चर्चा करणे. तसेच आदिवासी विभागांच्या घरकुल योजने अंतर्गत उद्दिष्टानुसार अप्राप्त रक्कम राज्य व्यवस्थापन कक्षास उपलब्ध करून देणे या विषयांवर चर्चा



करण्यासाठी बैठका घेण्यात आल्या. मंत्रालयीन बैठकांना राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक डॉ. राजाराम दिघे, श्रीमती मंजिरी टकले (उपसंचालक), नीलेश काळे(उपसंचालक) व आदिवासी विकास विभागाचे उप सचिव श्री. सु.ना. शिंदे उपस्थित होते.

## मा. अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल विभाग यांचेशी घरकुल विषयक अडचणी बाबत बैठक

मा. अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल विभाग यांच्या अध्यक्षतेखाली व मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रामीण आवास योजनांच्या जागेबाबत अडचणी व आवास योजनेच्या महसूल विभागाच्या संबंधित इतर मुद्यांबाबत चर्चा करण्यासाठी बैठक संपन्न झाली. या बैठकीला राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक डॉ. राजाराम दिघे, महसूल व वन विभागाचे कक्ष अधिकारी व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये घरकुल लाभार्थी गरिब असल्याने योजने अंतर्गत जागा खरेदी करण्यासाठी शुल्क माफ करणे. जागा खरेदी करतांना जागा मोजणी शुल्क माफ करणे. तुकडेबंदी कायद्यामुळे ५०० चौ.फूट जमीन खरेदी करता येत नाही, त्यामुळे योजने अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना जागा खरेदी करताना तुकडेबंदी कायद्यातील अट शिथिल करावी. योजने अंतर्गत जागा हस्तांतरण व हस्तांतरण शुल्क माफ करणे. ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत जागा खरेदीसाठी १० गुंठ्याच्या आतील किंवा आवश्यक त्या क्षेत्रासाठी खरेदी दस्ताऐवजी बक्षिस पत्र किंवा नोटरी दस्त मान्य करणे. ग्रामीण आवास योजनांच्या लाभार्थ्यांना शासकीय जमिनी मूल्यविरहित उपलब्ध करून देणे याबाबतच्या ०२ ऑगस्ट २०१८ रोजीच्या शासन निर्णयाची प्रभाविपणे अंमलबजावणी करणेबाबत जिल्हाधिकाऱ्यांना सूचित करणे. गावठाणा बाहेरील व



शासनाच्या विविध विभागांच्या जागेवरील अतिक्रमणे नियमानुकूल करणे. स्वयंसेवी संस्था व खासगी व्यक्ती यांनी बक्षिस पत्र वा दानपत्र याव्दारे घरकुल लाभार्थ्यांना उपलब्ध केलेल्या जागेच्या संदर्भात नोंदणी शुल्क, मुद्रांक शुल्क व मोजणी शुल्क माफ करणे. ग्रामीण आवास योजने अंतर्गत लाभार्थ्यांच्या घर बांधकामासाठी वाळूगट राखून ठेवून लाभार्थ्यांना घर बांधकामासाठी ५ ब्रास पर्यंत वाळू विनारॉयल्टी उपलब्ध करून देणे. या विषयांवर चर्चा करण्यात आली.

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाशी समन्वय बैठक

विविध शासकीय योजनांशी कृतीसंगम करून घरकुल लाभार्थ्यांना लाभ देण्याकरीता राज्य व्यवस्थापन कक्षाकडून विविध शासकीय विभागांशी समन्वय करण्यात येतो. याकरीता संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे दालनात पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडील जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) योजनांचा लाभ घरकुल लाभार्थ्यांना व्हावा याकरीता पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेचे संचालक श्री.राहुल साकोरे व राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक डॉ. राजाराम दिघे यांच्यात समन्वय बैठक घेण्यात आली. या बैठकीला राज्य व्यवस्थापन कक्षाचे सहाय्यक लेखाधिकारी श्री. संजय घोगळे व प्रशिक्षण समन्वय (माहिती, शिक्षण व सवांद) श्री. दिनेश मोवळे उपस्थित होते.

या बैठकीमध्ये घरकुल लाभार्थ्यांना जल जीवन मिशन मधून नळाने पिण्याचा पाण्याचा पुरवठा व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) मधून वैयक्तिक शौचालयाचा लाभ घरकुल लाभार्थ्यांना देणे बाबत चर्चा झाली. त्याचप्रमाणे घरकुल लाभार्थी यांची नोंद नळ जोडणी व शौचालयासाठी प्राधान्याने करण्यात यावी. याकरीता पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडील तालुका व जिल्हा स्तरीय यंत्रणेला सूचित करावे असे डॉ. राजाराम दिघे यांनी सांगितले. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडील योजनेचा लाभ घरकुल लाभार्थ्यांना निश्चितच होईल असे श्री.राहुल साकोरे यांनी डॉ. राजाराम दिघे यांना आश्वासित केले.

## विभाग, जिल्हा व तालुका स्तरीय यंत्रणा यांच्या विभाग निहाय व्हिडिओ कॉन्फरन्स

अभियान कालावधीत राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांच्या कामांना गतीमान करण्यासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या अध्यक्षतेखाली कोंकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागांच्या व्हिडिओ कॉन्फरन्सींग व्दारे बैठका घेण्यात आल्या.

या बैठकीला राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी/कर्मचारी यांच्यासह विभागीय आयुक्त कार्यालयाचे उप आयुक्त (विकास), सहाय्यक आयुक्त (विकास), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी व सबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकांमध्ये अभियान कालावधीत घरकुल योजना अधिक गतिमान व गुणवत्तापूर्ण करणे, आवास प्लस अंतर्गत आधार सिडींग, रिमांड व रिफंड केसेस, प्रलंबित घरकुले (Delayed Houses), PWL मधील लाभार्थ्यांचे आधार सिडींग करणेबाबत, पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, गवंडी प्रशिक्षण कार्यक्रम, AFMS प्रणाली अंतर्गत पंचायत समिती स्तरावर निधीचे नियोजन, नावीन्यपूर्ण उपक्रम, बहुमजली इमारतीची उभारणी, गृहसंकुल उभारणी, घरकुल मार्ट सूरू करणे, डेमो हाऊसेसचे बांधकाम व अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम राबविणे या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.





# महा आवास अभियान-ग्रामीण

# विविध संस्थांशी भागीदारी

# ग्रामीण आवास योजना गतिमान व गुणवत्तापूर्ण करण्यासाठी विविध कॉर्पोरेट संस्थांशी भागीदारी

### व्ही.एस.टी.एफ. सोबत भागीदारी बैठका

संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान (व्ही.एस.टी.एफ.) च्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ग्रामीण गृहनिर्माणचा व्ही.एस.टी.एफ. सोबत भागीदारी व कृतिसंगम करण्यासंदर्भात बैठका घेण्यात आल्या.

अभियान कालावधीत ग्रामीण आवास योजनांची माहिती समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी माहिती, शिक्षण व संवाद उपक्रमांची अंमलबजावणी व तालुक्यात डेमो हाऊसेस तयार करताना त्यामध्ये व्ही.एस.टी.एफ. मार्फत १०० तालुक्यात कॉप शॉप व त्याकरीता लागणारा अतिरिक्त निधी विषयी बैठकांमध्ये चर्चा करण्यात आली. या बैठकांना राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी/कर्मचारी, व्ही.एस.टी.एफ.चे अभियान व्यवस्थापक श्री.प्रफुल्ल रंगारी, अभियान व्यवस्थापक श्री. सागर शिर्के व कार्यक्रम व्यवस्थापक श्री. चंद्रकांत माळी उपस्थित होते.



### पेंट इंडस्ट्रीज सोबत भागीदारी बैठका

महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांतर्गत बांधण्यात आलेली घरकुले एकसमान दिसावीत, या उद्देशाने ग्रामीण आवास योजनेतील घरकुलांना एकसमान रंगसंगतीचा वापर करणे बाबत कळविले आहे.

ग्रामीण आवास योजनेतील घरकुलांचे रंगकाम अधिक गुणवत्तापूर्ण व मापक दरात व्हावे यासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांनी एशियन, नेरोलॅक, बर्गर व इतर पेंट इंडस्ट्रीज सोबत भागीदारी बाबत बैठका घेतल्या. राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाशी भागीदारीचा फायदा पेंट इंडस्ट्रीजलाही होईल असे डॉ. राजाराम दिघे यांनी उपस्थितांना सांगितले.

### आय.आय.टी. मुंबई, रिलायन्स फाऊंडेशन व हुडको यांचेशी पार्टनरशिप बाबत बैठका

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण व आय.आय.टी. मुंबई, रिलायन्स फाऊंडेशन व हाऊसिंग अँन्ड अर्बन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड (HUDCO) यांच्याशी पार्टनरशिप करण्यासंदर्भात मा.संचालक राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांनी आय.आय.टी. मुंबई, रिलायन्स फाऊंडेशन व हुडकोच्या अधिकाऱ्यांशी बैठका घेतल्या.

या बैठकांमध्ये आय.आय.टी.च्या सहयोगातून राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांना प्रशिक्षण देणे, इंटर्नशीपच्या माध्यमातून आय.आय.टी.मधील विद्यार्थ्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये सहभाग व ग्रामीण भागातील घरकुले अधिक दर्जेदार करण्यास सहकार्य करणे. हुडको (हाऊसिंग आणि अर्बन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन) यांच्याकडून ग्रामीण गृहनिर्माणासाठी तांत्रिक सहकार्य तसेच सीएसआर आदी माध्यमातून आर्थिक सहकार्य करणे. तसेच कमी खर्चातील घरकुलाचे तंत्रज्ञान विकसीत करण्यासाठी सहकार्य करणे. त्याचप्रमाणे घरकुल विषयक विविध योजनांची माहिती संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि लाभार्थ्यांपर्यंत ऑडीओ, व्हीडीओ तसेच टेक्स्ट मेसेजद्वारा पोहोचविण्यासाठी रिलायन्स फाऊंडेशन सहकार्य करणे या विषयांवर चर्चा करण्यात आली.



## अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांचेशी पार्टनरशिप बाबत बैठक

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयामार्फत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथील अभियांत्रिकीचे विद्यार्थी दरवर्षी विविध खाजगी कंपन्यांमध्ये इंटर्नशिप करतात. या अभियंत्यांच्या तांत्रिक व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात व्हावा याकरीता अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथे राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण व अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांच्यामध्ये पार्टनरशिप बाबत बैठक संपन्न झाली.

या बैठकीला राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक डॉ. राजाराम दिघे व वास्तूविशारद श्री.परमेश्वर शेलार त्यासोबर अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांचेकडून संचालक श्री. भारतकुमार आहुजा, स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख श्री.रणदिवे त्यासोबतच Computer/ IT आणि MBA विभागाचे विभाग प्रमुख व इतर अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये डॉ. राजाराम दिघे यांनी अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचा ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात सहभाग घेण्याबाबत चर्चा व त्याबाबतचे सादरीकरण केले. या सादरीकरणामध्ये ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात स्थापत्य अभियंता, संगणक (IT) अभियंता व इतर अभियंते यांच्या सहभागातून तांत्रिक सहाय्य, बांधकामातील गुणवत्ता, कामाचे मूल्यांकन, नावीन्यपूर्ण उपक्रम, कामाचे संनियंत्रण मूल्यमापन, सॉफ्टवेअरची निर्मिती, विकसीत माहिती प्रणाली व इतर अभियंत्यांच्या माध्यमातून माहिती, शिक्षण व सवांद उपक्रम, विविध शासकीय निमशासकीय विभाग, संस्था यांचेशी भागीदारी व कृतीसंगम या विषयी सविस्तर चर्चा करण्यात आली.



## आय.आय.टी. मुंबई, रिलायन्स फाऊंडेशन व हुडको सोबत भागीदारीची मा. मंत्री, ग्राम विकास यांची घोषणा

दि.२३ फेब्रुवारी २०२१ रोजी राज्यातील ग्रामीण भागातील घरकुल योजनांना चालना देण्यासाठी ग्रामविकास विभाग आणि आय.आय.टी. (मुंबई), रिलायन्स फाऊंडेशन व हुडको यांच्यामध्ये भागीदारी घोषणा मा. मंत्री, ग्राम विकास श्री.हसन मुश्रीफ यांनी केली.

राज्यात स्थानिक भौगोलिक परिस्थितीनुसार घरकुल डिझाईन करणे, कमी खर्चातील पण दर्जेदार अशा घरकुलाचे तंत्रज्ञान विकसीत करणे तसेच भूकंप, वादळ आदी नैसर्गिक आपत्तींचा सामना करु शकणाऱ्या घरकुलांची निर्मिती करण्यासाठी आय.आय.टी. (मुंबई) यांची मदत घेतली जाणार आहे. त्याचबरोबर आय.आय.टी.च्या सहयोगातून राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांना प्रशिक्षण देण्यात येणार असून इंटर्नशीपच्या माध्यमातून आय.आय.टी.मधील विद्यार्थ्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये सहभाग घेतला जाणार आहे. आय.आय.टी. ही देशातील अग्रगण्य आणि नामांकीत संस्था असून त्यांच्या सहयोगातून ग्रामीण भागातील घरकुले अधिक दर्जेदार होण्यास मदत होईल.

हुडको (हाऊसिंग आणि अर्बन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन) यांच्याकडून ग्रामीण गृहनिर्माणासाठी






तांत्रिक सहकार्य तसेच सीएसआर आदी माध्यमातून आर्थिक सहकार्य घेण्यात येणार आहे. मोठ्या गावांमध्ये बहुमजली इमारती तसेच हाऊसिंग कॉलनी आदींमध्ये सी.एस.आर.च्या माध्यमातून मुलभूत सुविधांची निर्मिती करण्यासाठी हुडको सहकार्य करेल. तसेच कमी खर्चातील घरकुलाचे तंत्रज्ञान विकसीत करण्यासाठीही हुडको सहकार्य करणार आहे.

घरकुल विषयक विविध योजनांची माहिती संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि लाभार्थ्यांपर्यंत ऑडीओ, व्हीडीओ तसेच टेक्स्ट मेसेजद्वारा पोहोचविण्यासाठी रिलायन्स फाऊंडेशन सहकार्य



करणार आहे. त्याचबरोबर ग्रामीण घरकुल योजनांची माहिती देण्यासाठी हेल्पलाईनही तयार करण्यात येणार आहे. या सर्वांच्या सहभागातून राज्यातील ग्रामीण भागातील घरकुलांचे उद्दीष्ट लवकरच पूर्ण होईल. असे मा. मंत्री महोदयांनी सांगितले.

याप्रसंगी ग्रामविकास विभागाचे मा. अतिरिक्त मुख्य सचिव, श्री. राजेश कुमार, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे, आयआयटी मुंबईचे प्रा. प्रकाश नाथागोपालन, रिलायन्स फाऊंडेशनचे श्री. अभिजित ठाकरे, हुडकोचे प्रादेशिक प्रमुख श्री. व्ही. टी. सुब्रम्हण्यम, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माणचे दोन्ही उपसंचालक श्रीमती मंजिरी टकले व श्री. नीलेश काळे आदी मान्यवर उपस्थित होते. ऑनलाईन प्रणालीद्वारे राज्यातील सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांचे प्रकल्प संचालक, गटविकास अधिकारी आदी संबंधीत अधिकारी उपस्थित होते.

## ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण घरकुल निर्मितीसाठी आय.आय.टी. मुंबई मार्फत १२०० ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांना प्रशिक्षण देण्याचा ग्राम विकास विभागाचा उपक्रम

### - मा. ना. श्री. हसन मुश्रीफ, मंत्री ग्राम विकास

भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई (IIT Bombay) आणि राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण यांचेमधील पार्टनरशिपची उद्घोषणा मा.मंत्री ग्राम विकास, श्री. हसन मुश्रीफ यांनी दि.२३.०२.२०२१ रोजी मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री. राजेश कुमार, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे व आय.आय.टी. मुंबईचे प्रा. प्रकाश नाथगोपालन यांच्या उपस्थितीत केली. या पार्टनरशिपच्या माध्यमातून ग्रामीण गृहनिर्माण योजनेमध्ये गतीमानता व गुणवत्ता आणण्यासाठी आय.आय.टी. मुंबई यांच्या माध्यमातून राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण अभियंते यांची क्षमता बांधणीसाठी प्रशिक्षण देण्याचा उपक्रम ग्राम विकास विभाग राबवित असल्याचे मा.मंत्री, ग्राम विकास, श्री. हसन मुश्रीफ यांनी सांगितले.

महाआवास अभियान-ग्रामीणला सर्व स्तरावरून मिळत असलेल्या सक्रीय सहभागामुळे राज्यात अभियान यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे. अभियान कालावधीत प्रधानमंत्री आवास योजना व विविध राज्यपुरस्कृत योजनांच्या माध्यमातून ३,५०,००० घरकुले पुर्ण करण्यात आली असून ३,९१,००० घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहेत, ती येत्या कालावधीत पूर्ण करण्यात येईल. त्याचप्रमाणे अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या इतर उपक्रमांचा कामातही लक्षणीय प्रगती दिसून येत असल्याचे मा. मंत्री महोदयांनी सांगितले.

महा आवास अभियानाच्या माध्यमातून सामजातले सर्व घटक जसे शासकीय यंत्रणा, खासगी संस्था, सहकारी संस्था, स्वंयसेवी संस्था, शिक्षण संस्था, सर्व भागधारक, लाभार्थी व लोकप्रतिनिधी या



सर्वांचा सक्रीय सहभाग घेण्यात येतो आहे. याचाच एक भाग म्हणून देशातील अग्रगण्य संस्था जसे आय.आय.टी. मुंबई, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग पुणे, एन.आय.टी. नागपूर इ. संस्थाचा सक्रीय सहभाग घेण्याचे काम प्रगतीत असल्याचे मा. मंत्री महोदयांनी स्पष्ट केले.

भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई (IIT Bombay) यांच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून ३ याप्रमाणे १०२ अभियंत्यांसाठी तीन टप्प्यात प्रशिक्षण आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यातील पहिल्या बॅचचे प्रशिक्षण दि. ३ ते ७ मे २०२१ या कालावधीत घेण्यात आले.

दि. ३ ते ७ मे २०२१ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षणामध्ये भूकंपरोधक घरकुल निर्माण, पर्यावरण पूरक गृहनिर्माण, बांधकाम साहित्यावरील संशोधन, बांधकाम क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, सनियंत्रण आणि मूल्यमापन, पाणी पुरवठा आणि भूमिगत गटारे तसेच स्थानिक भौगोलिक परिस्थिति नुसार घरकुल निर्माण आदि विषयांवर अभियंत्याची क्षमता बांधणी करण्यात आली आहे.

ग्राम विकास विभागाच्या राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण व आय.आय.टी. मुंबई यांच्या सयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षणाचा समारोप दि.०७.०५.२०२१ रोजी मा.मंत्री, ग्राम विकास, श्री. हसन मुश्रीफ, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री. राजेश कुमार, आय.आय.टी. मुंबईचे प्रा. प्रकाश नाथगोपालन व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या उपस्थितीत करण्यात आला. याप्रसंगी मा. मंत्री महोदयांनी सांगितले की, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता राज्यातील घरकुल योजनांसाठी अत्यंत महत्वाचा घटक असून त्यांची क्षमता बांधणी करण्यासाठी हे प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त आहे. तरी प्रशिक्षणार्थी गेल्या ५ दिवसात शिकलेल्या सर्व गोष्टींच्या आधारे आपल्या जिल्ह्यातील उर्वरीत सर्व अभियंत्याचे प्रशिक्षण आपण काटेकोरपणे घेण्याच्या सूचना मा. मंत्री महोदयांनी प्रशिक्षणार्थींना दिल्यात. त्याचप्रमाणे मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.राजेश कुमार यांनी सांगितले की, ज्या पध्दतीने आपण प्रशिक्षण घेतले त्याच पध्दतीने आपण खालीही प्रशिक्षण द्यावे. तसेच या प्रशिक्षणामध्ये आपण जे शिकलात त्याच्या आधारे लाभार्थ्यांना मार्गदर्शन करावे. आपण आत्मसात केलेल्या विविध तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रामीण भागातील घरांची गुणवत्ता कशी सुधारेल यावर लक्ष केंद्रीत करावे. अशा सूचना सर्व प्रशिक्षणार्थी अभियंत्यांना मा. अतिरिक्त मुख्य सचिव यांनी दिल्या.

या ५ दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोपा प्रसंगी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे यांनी मा.मंत्री, ग्राम विकास, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, आय.आय.टी. मुंबई व त्यांचे मुख्य प्रशिक्षक श्री. प्रकाश नाथगोपालन व प्रशिक्षणार्थीचे आभार मानले. तसेच आयआयटी मुंबई सारख्या नामांकित संस्थेमार्फत घेतलेल्या प्रशिक्षणाचा फायदा ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या गुणवत्तावाढीसाठी नक्की होईल असे मत डॉ. राजाराम दिघे यांनी व्यक्त केले.

या ५ दिवसीय प्रशिक्षणाला संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे सह, राज्य व्यवस्थापन कक्षाचे श्री. संतोष पानसरे, श्री. परमेश्वर शेलार, श्री. दिनेश मोवळे, जिल्हा, तालुकास्तरीय अभियंते व ग्रामीण गृहनिर्माण अभियंते प्रशिक्षणार्थी म्हणून उपस्थित होते. या संपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व नियोजन आय.आय.टी. मुंबई याच्या वतीने प्रा. प्रकाश नाथगोपालन यांनी केले.






# महा आवास अभियान-ग्रामीण

# धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मदत

# ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात गतिमानता व गुणवत्तावाढीसाठी धोरणात्मक निर्णयांसाठी मदत

**ग्रामीण गृहनिर्माण योजना संदर्भात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करून तसेच योजना अधिक कार्यक्षमतेने राबविण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्षाकडून विविध प्रस्ताव सादर करण्यात येतात व त्यानुसार धोरणात्मक निर्णय केंद्र व राज्य शासनाकडून घेण्यात येतात.**

## महा आवास अभियान-ग्रामीण

कोरोना महामारीच्या जीवघेण्या संकटामुळे संपूर्ण देशभरात ज्याप्रमाणे लॉकडाऊन लावण्यात आले, त्याचप्रमाणे राज्यात विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्वच योजनांना लॉक लागले. इतर योजनांप्रमाणेच ग्रामीण घरकुल योजनांच्या कामांची प्रगती मंदावली होती. यामुळे गरीब, गरजू व भूमीहीन लाभार्थ्यांच्या घरकुलांच्या स्वप्नालाही लॉक लागले होते. आता खरी गरज होती ती गृहनिर्माण क्षेत्रात गतीमानता आणण्याची म्हणजे घरकुल लाभार्थ्यांचे स्वतःच्या घराचे स्वप्न अनलॉक करण्याची!

गरीब, गरजू व भूमीहीन लाभार्थ्यांचे घरकुलांचे स्वप्न गतिमानतेने व गुणवत्तापूर्ण करण्याच्या संकल्पनेतून संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध आवास योजनांच्या कामात गतिमानता आणणे व गुणवत्ता वाढीसाठी "महा आवास अभियान-ग्रामीण" राबविण्याचे निश्चित झाले. त्यानुसार अभियाचे उद्देश, अभियानात राबविण्यात येणारे उपक्रम, अभियानाचे भौतिक व आर्थिक उद्दिष्ट्ये या बाबींसह अभियानाचा सविस्तर आराखडा तयार करण्यात आला.

संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गहनिर्माण कार्यालयाने राज्यात सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतिमान करण्यासाठी व गुणवत्तावाढीसाठी "महा आवास अभियान-ग्रामीण" राबविण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला. तसेच दरवर्षी २० नोव्हेंबर हा '**राष्ट्रीय आवास दिन**' म्हणून राबविण्यात येतो. या वर्षी आवास दिनाचे औचित्य साधून या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ करण्याचे प्रस्तावित केले.



"महा आवास अभियान-ग्रामीण" राबविण्याची संकल्पना मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग व मा.मंत्री, ग्राम विकास यांना घरकुल योजनांच्या कामात प्रगती आणण्याच्या दृष्टीने उपयुक्त वाटली. त्यानुसार ग्राम विकास विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रमांकः प्रआयो-२०२०/प्र.क्र.१०७/योजना-१०, दि.१९/११/२०२० अन्वये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध आवास योजनांना गतिमान करणे व गुणवत्ता वाढीसाठी सन २०२०-२१ या वर्षामध्ये महाराष्ट्र राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२० रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून राज्यात "महा आवास अभियान-ग्रामीण" राबविण्यास शासनाकडून मान्यता देण्यात आली. दि. २० नोव्हेंबर २०२० या अभियानाचा राज्यस्तरी शुभारंभ करण्यात आला.






## प्रधानमंत्री आवास योजन-ग्रामीणच्या लाभार्थ्यांना इलेक्ट्रीफीकेशनसाठी अर्थसहाय्य

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना व राज्य पुरस्कृत विविध घरकुल योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्यात येत आहे. या अभियानामुळे घरकुल बांधकाम गतिमान व गुणवत्तापूर्ण झाले. अभियान कालावधीत विविध आवास योजनांच्या कृतीसंगमातून घरकुल लाभार्थ्यांना शौचालय, पाणी पुरवठा, रोजगार, विद्युत जोडणी, गॅस जोडणी व उपजिविकेचे साधन इ.चा लाभ देण्यात येतो.

अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून दर्जेदार घरांची निर्मिती होत आहे. त्याच प्रमाणे लाभार्थ्याला घरातील अंतर्गत इलेक्ट्रीफीकेशन करीता अर्थसहाय्य दिले तर खऱ्या अर्थाने परिपूर्ण घराची निर्मिती होईल. अशी संकल्पना मा.मंत्री, ग्राम विकास व मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांची आहे.

घरकुल पूर्ण झाल्यावर लाभार्थी घरात त्याच्या सोयीनुसार व पैसा वाचविण्यासाठी अकुशल इलेक्ट्रीशियन कडून अंतर्गत इलेक्ट्रीफीकेसनचे काम करतो. ते कदाचीत हायपरटेन्सीव्ह आणि धोकेदायक, कमी दर्जाचे व चुकीचे होत असेल.

याप्रकरणी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालयाने जिल्हा परिषदेच्या इलेक्ट्रीकल अभियंत्यांकडून घरातील इलेक्ट्रीफीकेशन करीता येणाऱ्या खर्चाचे अंदाज पत्रक तयार केले. त्याकरीता येणारा अंदाजित खर्च रक्कम रू.९,४४४/- इतका आहे.

त्यानुषंगाने घरातील इलेक्ट्रीफीकेशनसाठी येणारा खर्च लाभार्थ्याला चौथ्या हप्त्या सोबत वितरीत करण्यात यावा. असा प्रस्ताव मंजूरीसाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालयाने केंद्र शासनाकडे सादर केला आहे. प्रस्ताव मंजूर झाल्यास याचा फायदा महाराष्ट्रासह इतर राज्यातील घरकुल लाभार्थ्यांनाही निश्चितच होईल.



## डेमो हाऊस बांधकामाबाबत मार्गदर्शक सुचना

ग्रामीण आवास योजनेतील लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम करतांना मार्गदर्शन व गुणवत्ता सुधारण्यासाठी केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत राज्यातील प्रत्येक पंचायत समिती आवारात एक डेमो हाऊस बांधण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार डेमो हाऊस बांधकामासाठी सात प्रकारच्या प्रकल्प अंमलबजावणी संस्थांचा (PIA) पर्याय देण्यात आला आहे. राज्यस्तरावरून विकेंद्रित पद्धतीला प्राधान्य देऊन त्यापैकी जिल्हा स्तरावरील शासकीय यंत्रणा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग या पर्यायाची प्रकल्प अंमलबजावणी संस्था म्हणुन निश्चिती करण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालय, नवी मुंबई, महाराष्ट्र यांनी केंद्र शासनाकडे सादर केला.

राज्य व्यवस्थापन कक्षाने सादर केलेल्या प्रस्तावाला केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. अशा प्रकारे प्रकल्प अंमलबजावणी संस्था नेमणेबाबत महाराष्ट्र राज्यासह देशातील सर्व राज्यांना परवानगी देण्यात आली.





## आदिवासी विकास विभाग अर्थसहाय्यीत आवास योजना करीता स्वतंत्र लोगो

राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना केंद्र व राज्य अर्थसहाय्यीत आहे. त्याचप्रमाणे राज्य पुरस्कृत विविध आवास योजना सामाजिक न्याय व विशेष विभाग, आदिवासी विकास विभाग, विमाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग व ग्राम विकास विभाग इ. विभागामार्फत अर्थसहाय्यीत आहेत.

दि. १५ फेब्रुवारी २०२१ रोजी मा.सचिव, आदिवासी विकास विभाग श्री. अनुप कुमार यांच्या उपस्थितीत आदिवासी विकास विभाग अर्थसहाय्यीत आवास योजनांसाठी लोगो निवडीसाठी बैठक घेण्यात आली. या बैठकीला संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे, उपसंचालक श्रीमती मंजिरी टकले व आदिवासी विकास विभागाचे उप सचिव श्री. सु.ना. शिंदे उपस्थित होते.

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक डॉ. राजाराम दिघे यांनी आदिवासी विकास विभाग अर्थसहाय्यीत शबरी, पारधी व आदिम आवास योजनांच्या घरकुलांची वेगळी ओळख व्हावी याकरीता आदिवासी विकास विभाग अर्थसहाय्यीत आवास योजनांसाठी लोगो निर्मितीची संकल्पना मा. सचिव महोदया समोर मांडली व त्या अनुषंगाने काही लोगोचे डिजाईनस मा. सचिव यांना सादर केले.

डॉ. राजाराम दिघे यांनी सादर केलेल्या लोगोपैकी एका लोगोची निवड आदिवासी विकास विभाग अर्थसहाय्यीत शबरी, पारधी व आदिम आवास योजना करीता मा. सचिवांनी केली. या लोगोचा वापर घरकुलांवर करणेबाबतच्या सूचना दिल्या. या लोगोमुळे आदिवासी विकास विभाग अर्थसहाय्यीत घरकुलांची वेगळी ओळख निर्माण होईल असे मा. सचिव, श्री.अनुप कुमार यांनी सांगितले.



आदिवासी विकास विभाग

शबरी/आदिम/पारधी आवास योजना

## डेमो हाऊसेस मध्ये विक्री केंद्र (Co-op Shop) ची संकल्पना

CO-OP SHOP

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत प्रत्येक पंचायत समिती आवारात डेमो हाऊस उभारण्यात येत आहे. बांधकाम पूर्ण झालेले डेमो हाऊसेस मार्गदर्शक वास्तु न राहता त्याचा उपयोग ग्रामीण जनतेला रोजगार उपलब्धततेसाठी व्हावा. या संकल्पनेतून संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांनी डेमो हाऊसेस मध्ये विक्री केंद्र (Co-op Shop) सुरू करण्याचा अभिनव उपक्रम राज्यात सुरू केला आहे.

या विक्री केंद्राच्या (Co-op Shop) माध्यमातून गावपातळीवर स्वनिर्मित साहित्य, जीवनोपयोगी वस्तु व शेत मालाची विक्री करता येणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील लोकांना त्यांचे साहित्य, वस्तु किंवा शेत विक्री करण्याकरीता भटकंती करावी लागणार नाही. त्यांना विक्री केंद्र (Co-op Shop) च्या माध्यमातून त्यांच्या हक्काची बाजारपेठ उपलब्ध होईल. तसेच ग्रामीण जनतेच्या वेळ व पैशाच्या बचती सोबतच रोजगार निर्मितीही होईल. डेमो हाऊसेसमध्ये सुरू होत असलेले विक्री केंद्र (Co-op Shop) महाराष्ट्र राज्यासह देशातील इतरही राज्याला प्रेरणादायी ठरेल.



# महा आवास अभियान-ग्रामीण

# घरकुल स्वप्नपूर्तीसाठी मुदतवाढ

# अभियानाला मिळालेले यश पाहता व लाभार्थ्यांना पावसाळ्यापूर्वी गृहप्रवेशासाठी मुदतवाढीची घोषणा

**- मा.ना.श्री. हसन मुश्रीफ, मंत्री, ग्राम विकास**



राज्यातील प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व सर्व राज्य पुरस्कृत आवास योजनांची अंमलबजावणी गतिमान करण्यासाठी व त्यामध्ये गुणवत्ता आणण्यासाठी राष्ट्रीय आवास दिन २० नोव्हेंबर २०२० पासून राबविण्यात येत असलेल्या महाआवास अभियान-ग्रामीणला प्रथम १ मे २०२१ व तदनंतर ०५ जून २०२१ पर्यंत मुदतवाढीच्या घोषणा मा. मंत्री, ग्राम विकास, श्री. हसन मुश्रीफ यांनी केल्या.

महा आवास अभियान-ग्रामीणला चांगले यश मिळाले असून प्रधानमंत्री आवास योजना व राज्यपुरस्कृत घरकुल योजनांमधून अभियान कालावधीत राज्यात ७ लाख ४१ हजार ५४५ घरकुलांचे बांधकाम करण्यात आले असून त्यापैकी ३ लाख ६२१ घरकुले बांधून पूर्ण करण्यात आली आहेत, तर ४ लाख ४० हजार ९२४ घरकुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. प्रगतीपथावर असलेल्या घरकुलांचे बांधकाम चालू महिन्याअखेर पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती मा.मंत्री, ग्रामविकास, श्री. हसन मुश्रीफ यांनी दिली. ग्रामीण भागात अभियानाला मिळालेले यश पाहता अभियानास १ मे २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याचेही मा.ना.श्री. मुश्रीफ यांनी जाहीर केले होते.

राज्यातील पात्र लाभार्थ्यांना पावसाळ्यापूर्वी गृहप्रवेश करता यावा तसेच घरकुलासोबतच शासनाच्या इतर योजनांचा लाभ देऊन त्यांचे जीवनमान उंचावावे यासाठी ५ जून २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असून उर्वरित घरकुलांचे काम गुणवत्तापूर्ण आणि जलदगतीने पूर्ण करण्यात यावे अशा सूचना सर्व जिल्हा परिषदांना देण्यात आल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.

मा. मंत्री, श्री. मुश्रीफ म्हणाले की, प्रगतीपथावर असलेले घरकुलेली येत्या कालावधीत पूर्ण होतील. अभियान कालावधीत वेळेत दर्जेदार घरकुले पुर्ण व्हावी व बांधकामासाठी गवंड्यांची कमतरता भासू नये यासाठी गवंडी प्रशिक्षणही राबविण्यात येत आहे.घरकुल बांधणीबरोबरच लाभार्थ्यांना इतर शासकीय योजनांचा लाभ मिळवून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी घरकुल योजनांचा इतर शासकीय योजनांशी कृतीसंगम करण्यात येत आहे. अभियान कालावधीमध्ये पूर्ण झालेली घरकुले तसेच आधीच्या काळात पूर्ण झालेली परंतु कृतीसंगमाचा लाभ न मिळालेल्या घरकुलांना देखील अभियान कालावधीत त्याचा लाभ देण्यात आला. यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून रोजगार, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) मधून शौचालयाचा लाभ, जल जीवन मिशन मधून लाभार्थ्यांना नळाद्वारे पाणी पुरवठ्याचा लाभ, प्रधानमंत्री उज्वला योजनेतून गॅस जोडणीचा लाभ, सौभाग्य योजनेतून वीज जोडणीचा लाभ व राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानातून लाभार्थ्यांना उपजिवीकेचे साधन मिळवून दिले आहे, अशी माहिती मा.मंत्री, श्री. मुश्रीफ यांनी दिली.

अभियानामध्ये नावीन्यपूर्ण उपक्रमांचाही समावेश करण्यात आला असून यामध्ये पुरेशी जागा नसलेल्या लाभार्थ्यांसाठी बहुमजली इमारती निर्माण करण्यात येत आहेत. तसेच जेथे पुरेशी जागा उपलब्ध आहे अशा ठिकाणी सर्व सोयीसुविधांनी युक्त गृहसंकुल उभारण्यात आले आहेत. लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाचे साहित्य एकाच छताखाली व जवळच उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने प्रत्येक तालुक्यामध्ये घरकुल मार्ट उभारण्यात आले आहेत. लाभार्थ्यांना अधिक सोयीसुविधायुक्त घरकुल बांधकामासाठी बँकेचे ७० हजार रुपये कर्ज स्वरुपात मिळवून देण्यात आले आहे. मुलभूत सुविधांद्वारे (अंतर्गत रस्ते, सांडपाणी व्यवस्था, पथदिवे, नळ जोडणी इत्यादी) आदर्श घरकुलांची उभारणीही अभियान कालावधीत करण्यात आली, असे मा.मंत्री श्री. मुश्रीफ यांनी सांगितले.

यापुढील काळातही घरकुल बांधकामांचे महाआवास अभियान मिशन मोडवर राबवून ग्रामीण भागातील सर्व बेघरांना आदर्श पद्धतीची घरकुले उपलब्ध करुन देण्यात येतील. अभियानात सर्व लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थांनी सहभाग घेऊन ते यशस्वी करावे, असे आवाहन मा.मंत्री श्री. मुश्रीफ यांनी केले.

# महा आवास अभियान-ग्रामीण

# गृहलक्ष्मीसाठी महिला दिनी विशेष उपक्रम

# "महा आवास अभियान-ग्रामीण" अंतर्गत जागतिक महिला दिनी महिला घरकुल लाभार्थींसाठी विशेष कार्यक्रम

## जागतिक महिला दिनी गृह लक्ष्मीच्या शुभहस्ते भूमीपूजन व गृह प्रवेश

महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत राज्यात विविध नावविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. राज्यात विविध आवास योजनांतर्गत ग्रामीण भागातील जनतेसाठी निवारा उपलब्ध व्हावा याकरीता "महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास, २०२२ पर्यंत सर्वांसाठी आवास" असे ध्येय निश्चित केले असून त्यानुसार युध्द पातळीवर घरकुलांची निर्मिती सुरू आहे. मात्र या विटा, मातीच्या घराला घरपण देण्याचे काम महिला करतात, म्हणूनच तर त्यांना गृहलक्ष्मीचे म्हणतात. अशा महिल्यांच्या सन्मानासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालयाच्या संकल्पनेतून जागतिक महिला दिनी ८ मार्च २०२१ रोजी महिला घरकुल लाभार्थींच्या हस्ते भूमीपूजन व गृह प्रवेशाचा नाविन्यपूर्ण उपक्रम राज्यभरात राबविण्यात आला.

८ मार्च हा महिलांच्या सन्मानासाठी जागतिक महिला दिन म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येतो. यावर्षीच्या जागतिक महिला दिनी अभियान कालावधीत संसाराचा गाडा कोणतीही तक्रार न करता सुखाने व नियोजबध्द पध्दतीने चालविणाऱ्या महिला घरकुल लाभार्थींसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करून राबविण्यात आला. यामध्ये महिला लाभार्थींच्या घरकुलांना प्राधान्याने मंजुरी देणे, महिला लाभार्थ्यींच्या मंजुर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे वितरण करणे, भूमीहीन महिला लाभार्थ्यींना जागा उपलब्धतेबाबत आवश्यक ती कार्यवाही तातडीने करणे, ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाकरीता इच्छुक महिला लाभार्थ्यींचा प्राधान्याने समावेश करणे, ज्या ठिकाणी डेमो हाऊसचे काम पूर्ण झाले अशा ठिकाणी विक्री केंद्र (Co-op Shop) ची उभारणी करून महिला बचत गटांना किंवा सक्षम महिलांना साहित्य विक्रीस विक्री केंद्र उपलब्ध करून देणे, बँक प्रतिनिधीच्या उपस्थितीत महिला मेळाव्यांचे आयोजन करून महिलांना गृहकर्ज मिळवून देणे, विविध शासकीय योजनांच्या कृतीसंगमातून महिला घरकुल लाभार्थींना स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) योजनेतून वैयक्तिक शौचालय, सौभाग्य योजनेतून विद्युत जोडणी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून रोजगार, जल जीवन मिशन योजनेतून नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, प्रधानमंत्री उज्वला योजनेतून गॅस जोडणी व राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानातून उपजिविकेचे साधन इत्यादीचा लाभ महिला घरकुल लाभार्थींना प्राध्यान्याने देण्यात आला.



फिजीकल डिस्टन्सींगचे नियमांचे पालन करून गाव सभेचे आयोजन करून त्यामध्ये अभियान कालावधीत घरकुलाचे बांधकाम पूर्ण करणाऱ्या महिला लाभार्थ्यींचा सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे जिल्हा व तालुका स्तरावर घरकुल महिला लाभार्थींसाठी विविध कार्यकर्माचे आयोजन करून





महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत राज्यात विविध नावविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. राज्यात विविध आवास योजनांतर्गत ग्रामीण भागातील जनतेसाठी निवारा उपलब्ध व्हावा याकरीता "महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास, २०२२ पर्यंत सर्वांसाठी आवास" असे ध्येय निश्चित केले असून त्यानुसार युध्द पातळीवर घरकुलांची निर्मिती सुरू आहे. मात्र या विटा, मातीच्या घराला घरपण देण्याचे काम महिला करतात, म्हणूनच तर त्यांना गृहलक्ष्मीचे म्हणतात.



अशा महिल्यांच्या सन्मानासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालयाच्या संकल्पनेतून जागतिक महिला दिनी ८ मार्च २०२१ रोजी महिला घरकुल लाभार्थींच्या हस्ते भूमीपूजन व गृह प्रवेशाचा नाविन्यपूर्ण उपक्रम राज्यभरात राबविण्यात आला.

८ मार्च हा महिलांच्या सन्मानासाठी जागतिक महिला दिन म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येतो. यावर्षीच्या जागतिक महिला दिनी अभियान कालावधीत संसाराचा गाडा कोणतीही तक्रार न करता सुखाने व



नियोजबध्द पध्दतीने चालविणाऱ्या महिला घरकुल लाभार्थीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करून राबविण्यात आला. यामध्ये महिला लाभार्थीच्या घरकुलांना प्राधान्याने मंजुरी देणे, महिला लाभार्थ्यींच्या मंजुर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे वितरण करणे, भूमीहीन महिला लाभार्थ्यींना जागा उपलब्धतेबाबत आवश्यक ती कार्यवाही तातडीने करणे, ग्रामीण गवंडी



प्रशिक्षणाकरीता इच्छुक महिला लाभार्थ्यींचा प्राधान्याने समावेश करणे, ज्या ठिकाणी डेमो हाऊसचे काम पूर्ण झाले अशा ठिकाणी विक्री केंद्र (Co-op Shop) ची उभारणी करून महिला बचत गटांना किंवा सक्षम महिलांना साहित्य विक्रीस विक्री केंद्र उपलब्ध करून देणे, बँक प्रतिनिधीच्या उपस्थितीत महिला मेळाव्यांचे आयोजन करून महिलांना गृहकर्ज मिळवून देणे, विविध शासकीय योजनांच्या कृतीसंगमातून महिला



घरकुल लाभार्थींना स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) योजनेतून वैयक्तिक शौचालय, सौभाग्य योजनेतून विद्युत जोडणी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून रोजगार, जल जीवन मिशन योजनेतून नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, प्रधानमंत्री उज्वला योजनेतून गॅस जोडणी व राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानातून उपजिविकेचे साधन इत्यादीचा लाभ महिला घरकुल लाभार्थीना प्राध्यान्याने देण्यात आला.

फिजीकल डिस्टन्सींगचे नियमांचे पालन करून गाव सभेचे आयोजन करून त्यामध्ये अभियान कालावधीत घरकुलाचे बांधकाम पूर्ण करणाऱ्या महिला लाभार्थींचा सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे जिल्हा व तालुका स्तरावर घरकुल महिला लाभार्थीसाठी विविध कार्यकर्माचे आयोजन करून भूमीहीन महिला लाभार्थीसाठी जागेची उपलब्धता, प्रशिक्षित महिला गवंडीना सन्मानपत्र वितरण व सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

आपले स्वतःचे हक्काचे घर व्हावे हे प्रत्येकाचे

# महा आवास अभियान-ग्रामीण

# लोकसहभाग

# महा आवास अभियान-ग्रामीणच्या यशस्वीतेसाठी शासकीय यंत्रणा व लोकप्रतिनिधींचा सक्रीय सहभाग

## महा आवास अभियान-ग्रामीण मुळे बेघर, गरिब व भूमीहीनांचे पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण झाले - मा.मुख्यमंत्री, श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे



मा. मुख्यमंत्री श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे यांनी दि.१२ फेब्रुवारी २०२१ रोजी पालघर जिल्ह्याचा दौरा केला. या दौ-या दरम्यान त्यांनी जव्हार येथील जामसर प्राथमिक आरोग्य केंद्राची पहाणी केली. पालघर मधील खरवंद येथे अंगणवाडीला व धापरपाडा येथे स्थानिक आदिवासींनी विकसीत केलेल्या पर्यटन स्थळाला भेट दिली. त्याचप्रमाणे जव्हार तालुक्यातील खडखड ग्रामपंचायतीतील ग्रामीण आवास योजनेच्या घरकुलांची पहाणी व घरकुल लाभार्थ्यांशी संवाद साधला.

घरकुल भेटी दरम्यान मा. मुख्यमंत्री श्री. विठ्ठल रमेश पारधी या लाभार्थ्यांच्या घरी गेले असता त्यांने मा.मुख्यमंत्री यांना लग्नाची निमंत्रण पत्रिका दिली व स्वतःचे घर झाल्यामुळे समाजात, गावात मिळालेली प्रतिष्ठा व जीवनमानात झालेला बदल याबाबत सांगितले. मा.मुख्यमंत्री महोदयांनी त्याची लग्नाचे निमंत्रण स्विकारून त्याला भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. स्वतःचे हक्काचे घर नसल्यामुळे लग्न जुळत नव्हते, त्यामुळे समाजात आणि गावात गमतीचा विषय होत चाललेल्या तरूणाला महा आवास अभियान-ग्रामीण मुळे स्वतःचे हक्काचे पक्के घरकुल मिळाले. स्वतःच्या घरकुलामुळे लग्न जुळले अशातच मा. मुख्यमंत्री महोदयांनी त्या तरूणाच्या गावातील घरकुल लाभार्थ्यांना भेटी दिल्या. यादरम्यान एका तरूण घरकुल लाभार्थ्यांने मा. मुख्यमंत्री महोदयांचे व शासनाचे आभार मानले व स्वतःच्या लग्नाची निमंत्रण पत्रिका दिली.

ग्रामपंचायत खडखड येथे ग्रामीण आवास योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलांची पहाणी व लाभार्थ्यांशी केलेल्या चर्चेतून मा. मुख्यमंत्री महोदयांच्या असे निदर्शनास आले की, या गावातील सर्व घरकुले महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत पूर्ण झाली आहेत. "महा आवास अभियान-ग्रामीण मुळे बेघर, गरीब व भूमीहीन लाभार्थ्यांचे पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण झाले" असे उदगार मा. मुख्यमंत्री महोदयांनी काढले.



## महा आवास अभियान-ग्रामीणच्या यशस्वीतेसाठी शासकीय यंत्रणा, मा.मंत्री, मा.पालकमंत्री, मा.खासदार, मा.आमदार व लोकप्रतिनिधींचा सक्रीय सहभाग

महा आवास अभियान-ग्रामीणच्या यशस्वीतेसाठी राज्यात विविध उपक्रम राबवून सर्व सन्माननिय मंत्री, राज्यमंत्री, पालकमंत्री, खासदार, आमदार, जिल्हा परिषद/ पंचायत समिती अध्यक्ष/ सभापती, सदस्य, शासकीय यंत्रणेचे अधिकारी, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, घरकुल लाभार्थी व ग्रामस्थ यांनी सक्रीय सहभाग नोंदविला आहे. यामध्ये अभियान क्षमता बांधणी कार्यशाळा, घरकुल भूमीपुजन, गृह प्रवेश, डेमो हाऊस भूमीपुजन, घरकुल मार्टचे उदघाटन, ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रम, आढावा बैठका, जागेची उपलब्धता, घरकुल बांधकामात नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणे व वाळूची उपलब्धता या सारख्या इतरही उपक्रमांचा समावेश आहे.

### महा आवास अभियान तळागाळापर्यंत पोहोचवा -मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, श्री. छगन भुजबळ यांचे आवाहन

महा आवास अभियान तळागाळातील आर्थिक दुर्बल घटकांपर्यंत पोहोचवून अभियानाची व्याप्ती वाढवावी अशा सूचना दि. ५ फेब्रुवारी २०२१ रोजी झालेल्या नाशिक जिल्हा स्तरीय कार्यशाळेच्या प्रसंगी मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी उपस्थितांना केल्या.

या कार्यशाळेला हंगामी विधानसभा अध्यक्ष श्री.नरहरी झिरवाळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. त्यासोबतच जिल्हा परिषद अध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर, आमदार दिलीप बनकर, यतीन पवार, हिरामन खोसकर, जिल्हाधिकारी सूरज मांढरे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी लीना बनसोड, जिल्हा परिषद सदस्य महेंद्र काळे व सिध्दार्थ बनारसे यांच्यासह प्रत्येक तालुक्यातून आमदार, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच व प्रशासक व्हिडीओ कॉन्फरन्सींगच्या माध्यमातून सहभागी झाले.




### अमरावती जिल्ह्यांतील भूमिहीन लाभार्थ्यांना बक्षिसपत्राव्दारे मिळणार हक्काची जागा

मा.मंत्री, महिला व बालविकास तथा अमरावती जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती यशोमती ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली व अमरावतीचे जिल्हाधिकारी श्री. शैलेश नवल यांच्या प्रमुख उपस्थितीत महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत विविध ग्रामीण आवास योजनांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीला जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या आढावा घेण्यात आला. सर्वांसाठी घरे २०२२ या शासनाच्या धोरणा अंतर्गत बेघर व भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यात मोहिम राबविण्याचे आदेश मा. मंत्री, महिला व बालविकास, श्रीमती यशोमती ठाकूर यांनी दिले.

विविध ग्रामीण आवास योजने अंतर्गत घरकुलास पात्र लाभार्थ्यांना स्वमालकीची जागा नसल्याने घरकुलाचा लाभ मिळत नाही, अशा लाभार्थ्यांना महसूल व वन विभागाच्या ३१ मार्च २०१६ च्या अधिसूचनेनुसार निवासी मालमत्ता ही पती, पत्नी, नातू, नात किंवा मयत झालेल्या मुलाची पत्नी अशा रक्तातील नात्यामध्ये बक्षीस पत्राच्या दस्तावर १ हजार रूपये इतकी फी देवून अधिकृत नोंदणी करता येईल. त्याकरीता अमरावती जिल्ह्यामध्ये ४७१८ भूमिहीन लाभार्थ्यांना रक्तातील नात्यामध्ये बक्षिसपत्रा व्दारे जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसे आदेश संबंधित विभागाना दिले असल्याचे श्री. शौलेश नवल यांनी सांगितले.



### मा. खासदारांच्या हस्ते भूमीपूजन

दि. २४ फेब्रुवारी, २०२१ रोजी महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत विविध आवास योजनांचा आढावा, घरकुल बांधकामासबंधी लाभार्थ्यांच्या अडचणीचे निराकरण व डेमो हाऊसचे भूमीपूजन करणेकामी बीडच्या खासदार श्रीमती प्रितमताई मुंडे पंचायत समिती केज येथे उपस्थीत होत्या. यावेळी तालुक्याच्या आमदार श्रीमती नमिताताई मुंदडा, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती, उपसभापती, पंचायत समिती सदस्य, गट विकास अधिकारी व इतर संबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

केज पंचायत समितीच्या वतीने आयोजित ग्रामीण गृहनिर्माण योजना, पशुसंवर्धन विभागांतर्गत नावीन्यपूर्ण योजना व विशेष घटक योजना या योजनांतर्गत लाभार्थ्यांना अनुदान वाटप व डेमो हाऊसचे भुमीपूजन श्रीमती प्रितमताई मुंडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

याप्रसंगी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व रमाई आवास योजनेच्या १६०६ लाभार्थ्यांना श्रीमती प्रितमताई मुंडे यांच्या हस्ते पहिल्या हप्त्याचे वितरण थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले.

पंचायत समिती कार्यालयाच्या आवारात सर्वांना मार्गदर्शक ठरेल असे डेमो हाऊस उभारण्यात येणार आहे. त्या डेमो हाऊसचे भूमिपूजन श्रीमती प्रितमताई मुंडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.



### अभियान जिल्ह्यात प्रभावीपणे राबवा - मा.मंत्री, सहकार, श्री. बाळासाहेब पाटील

महा आवास अभियान-ग्रामीण जिल्हास्तरीय कार्यशाळेप्रसंगी केंद्र व राज्य पुरस्कृत घरकुल योजनेंतर्गत गरजूंना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार घरे उपलब्ध करून देण्यासाठी हे अभियान जिल्ह्यात प्रभावीपणे राबवून पात्र लाभार्थ्यांना घरे देऊन जिल्ह्याचे



१०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करा असे आवाहन सातारा जिल्ह्याचे मा. पालकमंत्री तथा सहकार मंत्री, श्री.बाळासाहेब पाटील यांनी केले.

या कार्यशाळेला मा. राज्यमंत्री, गृह, श्री. शंभूराज देसाई, मा. खासदार, श्री. श्रीनिवास पाटील, मा. जिल्हा परिषद अध्यक्ष, श्री. उदय कबुले, मा.जिल्हा परिषद, उपाध्यक्ष, प्रदिप विधाते, जिल्हाधिकारी श्री. शेखर सिंह, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विनय गौडा, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. अविनाश फडतरे व इतर मान्यवर उपस्थित होते.

महा आवास अभियान-ग्रामीणमध्ये प्रत्येक ग्रामपंचायतींच्या सरपंचाना सहभागी करून ज्यांना घरकुले नाहीत अशांना प्राधान्याने घरकुलांचा लाभ द्यावा. सातार जिल्हा परिषद विविध योजना राबविण्यात नेहमीच राज्यात आघाडीवर असून त्याच प्रमाणे हे अभियान यशस्वीपणे राबवू. असे मा. राज्यमंत्री, गृह, श्री. शंभूराज देसाई यांनी सांगितले.

अन्न, वस्त्र व निवास या माणसाच्या मुलभूत गरजा असून घरकुलांबरोबर रोजगार निर्मितीवर भर द्यावा. तसेच महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्याबाबत योग्य नियोजन करावे, असे मा. खासदार, श्री. श्रीनिवास पाटील यांनी सांगितले.

सर्वांसाठी घरकुल महत्वाचे आहे. घरकुलांसाठी जागेची उपलब्धता, वाळूची उपलब्धता व बँक गृह कर्ज याकरीता तहसिलदार, गट विकास अधिकारी व बँकेचे अधिकारी यांच्या बैठका घेऊन या संबंधिचे प्रश्न मार्गी लावण्यात येतील, असे जिल्हाधिकारी श्री. शेखर सिंह यांनी सांगितले.

### अभियानामुळे जिल्ह्यात घरकुल उभारणीला गती - मा.पालकमंत्री, श्री.उदय सामंत

महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यात ८३७ मंजूर घरकुलांपैकी ८१६ घरकुलांना पहिल्या हप्ता वितरीत करण्यात आला



आहे. याव्यतिरिक्त नवीन ८७ मंजूर घरकुलांना पहिला हप्ता दिल्याने जिल्ह्यात घरकुल उभारणीच्या कामाला गती आली असल्याचे सिंधुदुर्ग जिल्ह्याचे मा.पालकमंत्री तथा मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, श्री.उदय सामंत यांनी सांगितले.

राज्य शासनाच्या रमाई आवास योजनेच्या निधीची उपलब्धता झाल्याने रमाई आवास योजनेच्या लाभार्थ्यांना पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या हप्त्याचे वितरण जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून करण्यात आले आहे. नवीन १० घरकुलांना मा. पालकमंत्री, श्री.उदय सामंत यांनी मंजूरी दिल्याने २०२०-२१ या वर्षाकरीता रमाई आवास योजनेचे उद्दिष्ट प्राप्त झाले असल्याचे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती दीपाली पाटील यांनी सांगितले.

अभियान कालावधीत जास्तीत जास्त घरकुले पूर्ण करण्यासाठी घरकुलांना मंजूरी व मंजूर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे वितरण करण्यासाठी जिल्ह्यात विशेष मोहिम राबवित असल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. प्राजित नायर यांनी सांगितले.

## महा आवास अभियान-ग्रामीण चित्ररथाचा मा.पालकमंत्री यांच्या हस्ते शुभारंभ

राज्यात महा आवास अभियान-ग्रामीणची प्रभावी अंमलबजाणी सुरू आहे. माहिती, शिक्षण व संवाद (IEC) कार्यक्रमांतर्गत अभियानाच्या प्रचार प्रसिध्दीसाठी विविध उपक्रमांचा वापर करण्यात येत असून परभणी जिल्ह्यामध्ये प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून दि. २६ जानेवारी २०२१ रोजी महा आवास अभियान-ग्रामीणच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी अभियानाची माहिती दर्शविणाऱ्या चित्ररथाचा शुभारंभ मा. मंत्री, अल्पसंख्यांक विकास व कौशल्य विकास व उद्योजकता तथा परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. नवाब मलिक यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. शिवानंद टाकसाळे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. विजय मुळीक, सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्री.अंकुश पाटमासे, शाखा अभियंता श्री.श्रीकृष्ण वसेकर व विस्तार अधिकारी श्री. नारायण शिंदे उपस्थित होते.

मा. पालकमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रियदर्शनी इंदिरा गांधी स्टेडीयम, परभणी येथे प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय ध्वजारोहन समारंभ संपन्न झाला. यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, परभणी यांच्या संकल्पनेतून ग्रामीण गृहनिर्माण योजना व महा आवास अभियान-ग्रामीणची माहिती दर्शविणाऱ्या चित्ररथाचे संचलन करण्यात आले.

## अभियानात गुणवत्तापूर्ण घरकुलांच्या निर्मितीसाठी गवंडी प्रशिक्षण

हिंगोली पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या जामठी बु. येथे महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमातून घरकुलांची निर्मिती व कुशल गवंडी तयार करण्यात आले.

अभियान कालावधीत घरकुल बांधकाम गतिमान व गुणवत्तापूर्ण होण्यासाठी ग्रामपंचायत जामठी बु. येथे ग्रामीण गवंडी प्रशिक्षणास कार्यक्रमांतर्गत ६ घरकुलांची कामे पूर्ण करण्यात आली. या प्रशिक्षण कार्यक्रमातून प्रति घरकुल ५ याप्रमाणे ३० कुशल गवंड्यांची निर्मिती करण्यात आली. या सर्व प्रशिक्षित गवंड्यांचा सत्कार हिंगोली पंयात समितीच्या वतीने करण्यात आला.

याप्रसंगी पंचायत समितीचे सहाय्यक गट विकास अधिकारी श्री. गणेश बोथीकर, सभापती श्रीमती सुमन झुळझुळे, श्री. गोविंदराव भवर, श्री.लक्ष्मण पवार, श्री. गणेश पाटील, श्री. शिवाजी देवकर व ग्रामसेवक श्री. राजू खिल्लारे उपस्थित होते.





## घरकुल योजना पूर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतींना पाच लाख - मा.आमदार, प्रा. रमेश बोरनारे

महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत सर्व घरकुले पूर्ण करेल अशा ग्रामपंचायतीस प्रोत्साहनपर पाच लाख रूपये निधी देण्याचे आश्वासन वैजापूर पंचायत समिती येथे अभियानाच्या तालुकास्तरीय शुभारंभीय कार्यशाळे प्रसंगी मा.आमदार, श्री.रमेश बोरनारे यांनी दिले.

यावेळी मा.आमदार, श्री.रमेश बोरनारे यांच्या हस्ते प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या १९२८ लाभार्थ्यांना घरकुलांचा ऑनलाईन पहिला हप्ता रूपये १५ हजार वितरीत करण्यात आला. यावेळी मा. आमदार यांनी विविध घरकुल योजनांचा आढावा घेतला तसेच वाळू उपलब्धता, जागा उपलब्धता व लाभार्थ्यांच्या इतर अडचणीवर मार्ग काढून अभियान कालावधीत दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे सर्व घरकुले पूर्ण करण्याच्या सूचना तहसिलदार व गट विकास अधिकारी यांना मा.आमदार, श्री.रमेश बोरनारे यांनी दिल्या.

या बैठकीला उपजिल्हा प्रमुख श्री.बाळासाहेब जगताप, सभापती मामाजी मिसाळ, गट विकास अधिकारी के.टी. जाधव, जिल्हा परिषद/पंचायत सदस्य, तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक उपस्थित होते.



## अभियानात अधिक घरकुले पूर्ण करावी - श्री. केंद्रेकर, विभागीय आयुक्त, औरंगाबाद

दिनांक १२.०२.२०२१ रोजी औरंगाबाद विभागाचे विभागीय आयुक्त श्री. केंद्रेकर यांनी खुलताबाद तालुक्यातील नादराबाद ग्रामपंचायतीला भेट दिली. या दौरा कार्यक्रमा दरम्यान श्री. केंद्रेकर यांनी महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत विविध आवास योजनांच्या प्रगतीबाबत आढावा घेतला. अभियान कालावधीत जास्तीत जास्त घरकुलांचे बांधकाम पूर्ण करून राज्यात जिल्हा व विभाग प्रथम क्रमांकावर येण्याकरीता सर्वोतोपरी प्रयत्न करण्याचे आवाहन श्री.केंद्रेकर यांनी सर्व उपस्थितांना केले.

त्यानंतर श्री. केंद्रेकर यांनी ग्रामपंचातीमध्ये पूर्ण झालेले व बांधकाम प्रगतीत असलेल्या घरकुलांची पहाणी केली. तसेच ग्रामस्थ व घरकुल लाभार्थ्यांना विविध घरकुल योजना संदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.मंगेश गोंदवले, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्रीमती संगीतादेवी पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संतोष कवडे, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी व इतर संबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.



## अभियानाची उद्दिष्टपूर्ती विहीत मुदतीत करावी - श्री.पापळकर, जिल्हाधिकारी अकोला

अकोला जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. जी. एस. पापळकर यांच्या अध्यक्षतेखाली दि. २८ जानेवारी २०२१ रोजी जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे महा आवास अभियान-ग्रामीणची आढावा बैठक घेण्यात आली.

या बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सौरभ कटियार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.पवार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.सुरज गोहाड, अकोला जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, जिल्हा प्रोग्रामर श्री. श्रीकांत वाघमारे व इतर संबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.



सदर बैठकीमध्ये अभियानात राबवित असलेले उपक्रम व विविध घरकुल योजनांचा तालुका निहाय आढावा घेतला. तसेच घरकुल योजनांची कामे विहीत मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी उपस्थितांना दिल्या.

### महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत गोंदिया जिल्ह्याची रेकॉर्ड ब्रेक कामगीरी

महा आवास अभियान-ग्रामीणची अंमलबजावणी राज्यात सुरू आहे. अभियान कालावधीत ८६ हजार घरकुलांना मंजूरी देण्याचा रेकार्ड गोंदिया जिल्ह्याने केला आहे. त्यांच्या या विराट कामगीरी बद्दल गोंदिया जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. प्रदीप कुमार डांगे व सबंधित ग्रामीण गृहनिर्माण यंत्रणेचे अधिकारी/कर्मचारी यांच्यावर सर्व स्तरावरून कौतुकाचा वर्षाव होतो आहे.

या उपलब्धीसाठी श्री. प्रदीप कुमार डांगे यांनी ग्रामपंचायतींना क्षेत्रीय भेटी देवून घरकुल बांधकामासाठी वाळू, विटा तथा इतर साहित्याची येणारी शासकीय अडचण दुर केली. त्याकरीता त्यांनी थेट वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर चालकांशी सवांद साधून घरकुल बांधकामासाठी वाहतुकीसाठी कमी दर आकारण्याचे आवाहन केले. यामुळे जिल्हात ८६ हजार घरकुलांना मंजूरी देण्यात आली असून आतापर्यंत ४५ हजार घरकुलांचे काम पूर्णत्वास आले आहे. श्री.प्रदीप कुमार डांगे यांच्या प्रयत्नामुळे लाभार्थ्यांच्या घरकुल बांधकामा संबंधीच्या अडचणी दूर झाल्या आहेत. त्यामुळे कित्येक बेघर व गरजू लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे लाभार्थ्यांमध्ये व गृहनिर्माण यंत्रणेमध्ये आनंदाचे वातावरण आहे.



### नाशिक विभागात डेमो हाऊस बांधकामात धुळे जिल्हा अव्वल स्थानी

नाशिक विभागात नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगांव व अहमदनगर या ५ जिल्ह्यांचा समावेश आहे. घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत राज्यात सर्व जिल्ह्यांना प्रत्येक पंचायत समिती आवारात एक डेमो हाऊस बांधकामाचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. धुळे जिल्ह्यात ४ तालुके असून या चारही पंचायत समिती आवारामध्ये डेमो हाऊसेसची उभारणी करून धुळे जिल्ह्याने विभागातच नाही तर राज्यातही डेमो हाऊस बांधकामात अव्वल स्थान पटकाविले आहे.

महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत जवळ जवळ सर्वच पंचायत समिती मध्ये डेमो हाऊसेस बांधकाम प्रगतीत असून बहुतांश डेमो हाऊसेसचे काम पूर्ण झाले आहे. धुळे जिल्ह्यात सर्व पंचायत समितीमध्ये डेमो हाऊसेसची निर्मिती करण्यात आली आहे. याकरीता धुळे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वान्मथी सी., जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.बी.एम.मोहन, सर्व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व उप अभियंता बांधकाम यांनी विशेष परिश्रम घेतले आहे. त्यांच्या या कामगीरीबद्दल सर्व स्तरावरून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होतो आहे.



### कोकण विभागातील पहिले घरकुल मार्ट आणि डेमो हाऊस मुरबाड तालुक्यात - मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ.भाऊसाहेब दांगडे

ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात विविध घरकुल योजनांतर्गत पक्क्या घरांचे बांधकाम सुरू आहे. लाभार्थ्यांनी घरे बांधताना त्या ठिकाणची स्थानिक भौगोलिक परिस्थिती, पारंपरिक बांधकाम पद्धती अनुसरून घरे बांधावीत यासाठी मुरबाड पंचायत समिती आवारात 'डेमो हाऊसेस' बांधण्यात येत आहे. तसेच घरकुलांसाठी लागणारी साधन सामग्री एकाच छताखाली मिळावी यासाठी सरळगाव येथे महिला उद्योजक समूहाने 'शाश्वत घरकुल मार्ट' उभारले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भाऊसाहेब दांगडे आणि जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुभाष पवार यांच्या हस्ते या उपक्रमांचा शुभारंभ करण्यात आला. हे दोन्ही उपक्रम कोकण विभागात प्रथमच राबविले जात असल्याचे श्री.दांगडे यांनी सांगितले. यावेळी जिल्हा आणि तालुका स्तरावरील विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

या दोन उपक्रमामुळे नागरिकांना घर बांधतांना आणि साधन सामग्री जमवताना सुलभ होणार आहे. तसेच लाभार्थ्यांना राहण्यासाठी सोयीस्कर व लाभार्थी स्नेही घरकुल बांधकामाला मार्गदर्शन ठरणार आहेत. घरकुल मार्ट मुळे महिलांना आर्थिक दृष्ट्या समक्ष बनण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. प्रत्येक तालुक्यात हे दोन्ही उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे असल्याचे श्री.दांगडे यांनी सांगितले. अभियान कालावधीत १०० टक्के उद्दिष्ट साध्य करण्यासाठी यंत्रणांनी जलद काम करण्याचे निर्देशही श्री.दांगडे यांनी दिले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य श्रीमती रेखा कंटे यांनी घरकुल मार्ट मधून १० हजार रूपयांच्या सिमेंट गोण्या खरेदी करून महिलांना प्रोत्साहन दिले.



## पर्यावरण पुरक डेमो हाऊसची निर्मिती, कागल पंचायत समितीचा अभिनव उपक्रम

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत सर्व पंचायत समिती आवारामध्ये डेमो हाऊसचे बांधकाम करण्यात येत आहे. कोल्हापूर जिल्हातील कागल पंचायत समिती आवारात डेमो हाऊसचे बांधकाम करतांना पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. सुशिल संसारे यांच्या संकल्पनेतून डेमो हाऊस मध्ये शौचालयाचे बांधकाम विटा ऐवजी प्लास्टिक बॉटल्सचा वापर करून करण्यात येत आहे. हा पर्यावरण पुरक अभिनव उपक्रम सर्वांसाठी चर्चेचा विषय झाला आहे.

प्लास्टिक सारख्या अविघटनशिल घटकामुळे पर्यावरणाची व जनावरांची मोठ्या प्रमाणात हानी होते. प्लास्टिक मुळे होणारी पर्यावरणाची हानी रोखण्यासाठी वापरात टाकाऊ प्लास्टिक बॉटल्समध्ये इतरही प्लास्टिक कचरा जसे बिस्कीट रॅपर, गिफ्ट रॅपर, प्लास्टिक पिशवी इ. स्वच्छ व कोरडे करून भरला. या कामाला गती येण्यासाठी श्री. सुशिल संसारे यांनी त्यांनी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळेंच्या केंद्र प्रमुख व मुख्याध्यापकांची बैठक घेऊन त्यांना प्लास्टिक बॉटल्समध्ये प्लास्टिकचा कचरा भरण्याचे प्रात्यक्षिक दिले. त्यासोबतच प्रत्येक जिल्हा परिषद शाळेला १० प्लास्टिक बॉटल्स विद्यार्थ्यांमार्फत भरून घेण्याचा उपक्रम दिला. त्यामुळे गावातील जाळला जाणारा प्लास्टिक कचरा याकामी उपयोगात आला. याच्या परिणामस्वरूपी गावातील प्लास्टिकचा कचरा कमी झाला आणि विद्यार्थ्यांनाही पर्यावरणाची गोडी लागून प्लास्टिक निर्मुल कसे करावे याची माहिती मिळाली.

सर्व जिल्हा परिषदेंच्या शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. त्यामुळे पंचायत समितीला मोठ्या प्रमाणात कचऱ्याने भरलेल्या प्लास्टिक बॉटल्स जमा झाल्यात. शौचालय बांधकामाकरीता अंदाजे ८०० ते १००० प्लास्टिक बॉटल्स लागतात. हा उपक्रम तालुक्यातील इतर बांधकामासाठी करणार असल्याचे श्री. सुशिल संसारे यांनी सांगितले.

हा उपक्रम राबविण्यासाठी पंचायत समितीच्या सभापती श्रीमती पूनम मगदूम, उपसभापती श्रीमती अंजना सुतार, सर्व पंचायत समिती सदस्य, गट विकास अधिकारी श्री. सुशिल संसारे, सहाय्यक गट विकास अधिकारी श्री. माळी, उप अभियंता श्री. चांदणे, शाखा अभियंता श्री. शेळके, गवंडी प्रशिक्षक श्री. अविनाश सुतार व इतर पंचायत समितीचे अधिकारी/कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.



# महा आवास अभियान-ग्रामीण

# फलश्रुती

# "महा आवास अभियान-ग्रामीण" फलश्रुती

## महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्याचे उद्देश

- राज्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे.
- ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये शासकीय यंत्रणेबरोबरच समाजातील सर्व घटक जसे- पंचायत राज संस्था, स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था, खासगी संस्था (Corporates), तंत्र शिक्षण संस्था, बँका, लोकप्रतिनिधी, लाभार्थी, ग्रामस्थ, इ. चा सक्रीय सहभाग वाढविणे.
- ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रामध्ये नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून घरांचा दर्जा व गुणवत्ता वाढविणे.
- ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांसाठी शासनाच्या विविध योजनांचा कृतिसंगम (Convergence) घडवून आणणे.
- राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील भागधारकांची क्षमताबांधणी व जन-जागृतीद्वारे लोक चळवळ उभी करणे.

## अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची फलश्रुती

### भूमीहीन लाभार्थ्यांना जागा

ग्रामीण गृहनिर्माण योजनेंतर्गत भूमीहीन, बेघर, गरजू, पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांचे स्वतःच्या घरकुलाचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दृष्टीने अभियान कालावधीत शासनाच्या पंडीत दीनदयाल उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्याची योजना, ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना किंवा इतर मार्गाने (जसे बक्षिसपत्र) इत्यादी योजनांमधून जागा उपलब्ध करुन त्यांचे घरकुले पूर्ण करण्यात आले.

राज्यात १,१०,६५४ पात्र लाभार्थ्यांचे जागे अभावी घरकुलाचे स्वप्न अपूर्ण होते. या करीता अभियान कालावधीत शासनाच्या विविध योजनां मधून राज्यात भूमीहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता करण्यात आली असून यामध्ये कोकण विभाग ३६०, नागपूर विभाग ७,९५४, नाशिक विभाग १६,३४०, औरंगाबाद विभाग २,०६९, अमरावती विभाग १९,०२५ व पुणे विभाग ४,०९८ एकुण ४९,८४६ (४५.०%) लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करून त्यांचे घरकुले पूर्ण करण्यात आली आहे.



**अ) पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना :-** या योजने अंतर्गत घरकुल बांधकामासाठी भूमीहीन लाभार्थ्यांस ५०० चौ.फू. पर्यंत जागेसाठी प्रत्यक्ष जागेची किंमत किंवा रु.५०,०००/- यापैकी जे कमी असेल तेवढे अर्थसहाय्य प्रति लाभार्थी अर्थसहाय्य देय आहे. मोठ्या ग्रामपंचायती/शहरा लगतच्या ग्रामपंचायती मध्ये स्थानिक प्राधिकरणाच्या नियमावलीनुसार २ मजली (G + १) किंवा ३ मजली (G + २) इमारतींच्या भूखंडासाठी प्रति लाभार्थी रुपये ५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य देय आहे.

पंडीत दीनदयाल उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजने अंतर्गत राज्यात एकुण ३,०५३ घरकुल लाभार्थ्यांनी लाभ घेतला असून अभियान कालावधीत ८३७ भूमीहीन लाभार्थ्यांना जागा खरेदीसाठी अर्थसहाय्य करण्यात आले आहे.



**ब) शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्याची योजना :-** या योजने अंतर्गत जिल्हाधिकारी व शासनाकडून उपलब्ध झालेल्या शासकीय/संपादित जागा आणि ग्रामपंचायत अंतर्गत गावठाण हद्दीतील जागा घरकुल बांधकामासाठी विनामूल्य उपलब्ध करण्यात येते.

या योजने अंतर्गत राज्यात एकुण १४,३८३ लाभार्थ्यांना जागेचा लाभ दिला असून अभियान कालावधित ८,०६९ घरकुल लाभार्थ्यांना शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आल्या आहे.



**क) ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना :-** या योजने अंतर्गत गायरान, वन जमिनी, सार्वजनिक वापरातील जमिनी व वास्तव्यास अयोग्य जमिनी वगळून इतर शासकीय जमिनी वरील अतिक्रमणे सध्या आहे त्या ठिकाणी नियमानुकूल करण्यात येते. अशा ठिकाणी शक्य नसल्यास, अशा अतिक्रमणांचे पर्यायी जागेत पुनर्वसन करण्यात येते. दि.०१.०१.२००० पूर्वीचे बेघर कुटुंबांचे ५०० चौ.फू. पर्यंतचे अतिक्रमणे निशुल्क करण्यात येते. निवासी व इतर प्रयोजनार्थ जास्तीत जास्त २००० चौ.फू. पर्यंत अतिक्रमण नियमानुकूल शुल्क भरून नियमानुकूल करण्यात येते.

या योजने अंतर्गत राज्यात ग्रामीण भागातील एकुण १२,४१३ निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करण्यात आली असून अभियान कालावधीत ५,१४७ घरकुल लाभार्थ्यांचा या योजनेचा लाभ झाला आहे.



**ड) वा इतर मार्गाने (जसे बक्षिसपत्र) जागा उपलब्ध करुन देणे :-** भूमीहीन घरकुल लाभार्थ्यांना शासनाच्या पंडीत दीनदयाल उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्याची योजना, ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना या योजनांसह इतर मार्गाने (जसे बक्षिसपत्र, दानपत्र रक्तातील नात्यातील व्यक्तीस संमतीपत्र) जागेची उपलब्धता करण्यात येते.

या व्दारे राज्यात एकुण १९,९९७ घरकुल लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता झाली असून अभियान कालावधीत १७,८७४ लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ झाला आहे.




## घरकुलांना मंजूरी

राज्यस्तरावरुन केंद्र व राज्य पुरस्कृत विविध आवास योजनांतर्गत सन २०१६-१७ ते २०२०-२१ पर्यंत घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. परंतु उद्दिष्टांना जागे अभावी, लाभार्थ्याची अनुत्सुकता, योजनेबद्दल अपूरी माहिती काही इतर कारणांनी घरकुलांना मंजूरी देण्याचा कामात विलंब होत होता. या सर्व बाबींचा विचार करता अभियान कालावधीत घरकुलांना १०० टक्के मंजूरी देण्याच्या कामावर भर देण्यात आला. उद्दिष्टांप्रमाणे लाभार्थ्याला लाभ देण्याला प्राधान्यक्रम देण्यात आला. मात्र विविध उपयायोजना करुनही अशा घरकुलांना मंजूरी देणे शक्य नसेल अशा परीस्थितीत घरकुल रद्द करणेबाबत कार्यवाही करण्यात आली.



राज्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ११,०३,४७९ व राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांतर्गत ४,३४,४४३ घरकुल मंजूरीचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ९,८६,८८२ (८९.४%) व राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांतर्गत ४,१२,७६२ (९५.०१%) घरकुलांना मंजूरी देण्यात आली आहे.

## मंजूर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे वितरण

केंद्र व राज्य पुरस्कृत विविध आवास योजनांतर्गत सन २०१६-१७ ते २०२०-२१ मधील मंजूर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे वितरण विनाविलंब करण्यासाठी अभियान कालावधीत घरकुलांना मंजूरी दिल्याबरोबर या लाभार्थ्यांचा मेळावा आयोजित करुन त्यांच्या घरकुलांना मंजूरी व या बद्दल अवगत करण्यात आले. लाभार्थ्यांना घरकुल पूर्ण करणेबाबत असलेली जबाबदारीची व घरकुल पूर्ण करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या टप्प्यांची माहिती देण्यात आली. पहिल्या हप्त्याचे प्रदान करणेपूर्वी बँक खात्याची पडताळणी करुन विनाविलंब करारनामा व पहिल्या हप्त्याचे प्रदान करण्यात आले.

राज्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ९,८६,८८२ व राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांतर्गत ४,१२,७६२ मंजूर घरकुलांपैकी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ९,४७,३१० (९६%) व राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांतर्गत ३,९०,३५० (९४.६%) घरकुलांना पहिल्या हप्त्याचे वितरण करण्यात आले आहे.




## भौतिकदृष्ट्या पूर्ण घरकुले

केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत सन २०१६-१७ ते २०२०-२१ मधील उद्दिष्टानुसार घरकुलांचे काम भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्यासाठी अभियान कालावधीत विविध आवास योजनांतर्गत घरकुले पूर्ण करुन लाभार्थ्यांना घरकुलांच्या कामाची टप्पानिहाय भौतिक तपासणी करुन, जीओ टॅगींग करुन, टप्पानिहाय हप्ते विनाविलंब वितरीत करण्यात आले. घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्यासाठी लाभार्थ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन देण्यात आले.

राज्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ९,८६,८८२ व राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांतर्गत ४,१२,७६२ घरकुलांच्या उद्दिष्टापैकी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ६,६३,७१६ (६७.३%) व राज्य पुरस्कृत आवास योजनांतर्गत २,६२,७३२ (६३.७%) घरकुले आर्थिक दृष्ट्या पूर्ण करण्यात आली आहे.



## प्रलंबित घरकुले पूर्ण

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुलांना पहिला हप्ता प्रदान केल्यापासून १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेल्या, मात्र



अद्यापपर्यंत अपूर्ण असलेली प्रलंबित घरकुले (Delayed Houses) अभियान कालावधीत प्राधान्याने पूर्ण करणे व यापुढे अशा यादीमध्ये घरकुलांचा समावेश होणार नाही यासाठी लाभार्थ्यांशी नियमित संपर्क ठेऊन, कामाचा पाठपुरावा करून, आवश्यकतेनुसार लाभार्थी मेळावे व गृहभेटी करून त्याचप्रमाणे बांधकामासाठी आवश्यक साहित्य, गवंडी, जमीन इत्यादींची उपलब्धता करण्यात आली.

अभियान कालावधीत राज्यातील ९१४२६ प्रलंबित घरकुलांपैकी पुणे विभाग - २,७९९, नाशिक विभाग - ७,९०६, अमरावती विभाग - १,५८३ औरंगाबाद विभाग - ७१९, नागपूर विभाग - ३९१ व कोकण विभाग - ३२९ अशी एकुण - १३,०६९ प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यात आली.

## आर्थिकदृष्ट्या घरकुले पूर्ण

केंद्र पुरस्कृत योजना व राज्य पुरस्कृत योजनांमधील सन २०१६-१७ ते २०२०-२१ मधील सर्व घरकुलांना भौतिक प्रगतीनुसार सर्व हप्ते प्रदान करून सर्व घरकुले आर्थिकदृष्ट्या पूर्ण करण्यासाठी अभियान कालावधीत घरकुलांच्या भौतिक प्रगतीची तपासणी, वेळोवेळी टप्पानिहाय फोटो काढणे, जिओ टॅगींग, तसेच आवाससॉफ्ट प्रणालीवर अहवाल अपलोड करुन हप्ते तात्काळ वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात आली. घरकुलाचे निश्चित केलेले टप्पे विहित कालावधीत पूर्ण करुन सर्व हप्त्यांचे प्रदान करण्यात आल्याने अभियान कालावधीत ही घरकुले आर्थिकदृष्ट्या पूर्ण झाली.

राज्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ६,६३,७१६ व राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांतर्गत २,६२,७३२ भौतिक दृष्ट्या पूर्ण झालेल्या घरकुलांपैकी प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ५,३३,०८५ (८०.३%) व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत १,८३,०७८ (६९.७%) घरकुले आर्थिक दृष्ट्या पूर्ण करण्यात आली.



## ग्रामीण गवंडी प्रशिक्षण

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी




प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत दिलेले उद्दिष्ट प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांशी (Training provider) समन्वय ठेवून पूर्ण करुन कुशल गवंडी तयार करणेसाठी अभियान कालावधीत दिलेल्या उद्दिष्टानुसार ग्रामीण गवंडी प्रशिक्षणासाठी इच्छुक प्रशिक्षणार्थ्यांची निवड करून प्रशिक्षण देणाऱ्या (Training provider) संस्थांशी समन्वय ठेवून प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले.

राज्यात ग्रामीण गवंडी प्रशिक्षणांतर्गत २२०२० उद्दिष्ट प्राप्त झाले असून अभियान कालावधीत अमरावती विभाग २,२७५, औरंगाबाद विभाग १,७४०, नागपूर विभाग १,५२५, नाशिक विभाग १,६६८, पुणे विभाग १,८५५ व कोकण विभाग ७८० एकुण ९,८४३ (४४.७%) ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करून कुशल गवंड्यांच्या निर्मिती करण्यात आली आहे.



## डेमो हाऊसेस (Demo House) उभारणी

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत जिल्ह्यास दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे पंचायत समिती निहाय सर्व डेमो हाऊसेस (Demo Houses) पूर्ण करण्यासाठी पंचायत समिती आवारात जागेची निवड, तांत्रिक अधिकारी निवड व प्रत्यक्षात बांधकामाला सुरूवात करून डेमो हाऊसेस उभारणी करण्यात आली.

राज्यात ३५१ पंचायत समिती असून अभियान कालावधीत या सर्व पंचायत समिती आवारात डेमो हाऊसेस उभारण्याच्या कामास गति देण्यात आली. परंतु काही पंचायत समिती आवारात जागेची उपलब्धता न झाल्याने अशा ठिकाणी तहसिल कार्यालयात अथवा इतर शासकीय कार्यालयात डेमो हाऊसेससाठी जागेची उपलब्धता करण्यात आली.

अभियान कालावधीत डेमो हाऊसेस बांधकामासाठी ३३८ ठिकाणी जागेची उपलब्धता करण्यात आली असून या सर्व ठिकाणी तांत्रिक अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत ३२० ठिकाणी डेमो हाऊसेसचे बांधकाम प्रगतीत असून २२६ प्लिंथ लेव्हलला, १८४ लिंटेल लेव्हलला, १४५ रूफ लेव्हलला आहेत. अभियान कालावधीत नाशिक विभाग ३५, कोकण विभाग १७, पुणे विभाग २८, नागपूर विभाग २३, औरंगाबाद विभाग १२ व अमरावती विभाग ५ अशा एकुण १२० डेमो हाऊसेसची उभारणी करण्यात आली आहे.

अभियान कालावधीत डेमो हाऊसेस उभारणी या उपक्रमाला सर्व स्तरावरून सक्रीय सहभाग मिळाला




आहे. डेमो हाऊसची पायाभरणी मा.आमदार, जिल्हा परिषद व पंचायत समितीचे अध्यक्ष/सभापती/सदस्य, जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. त्याचप्रमाणे मा. आमदार यांच्या हस्ते पूर्ण झालेल्या डेमो हाऊसेसचे लोकार्पण अभियान समाप्तीच्या दिवशी करण्यात आले.

## कायमस्वरुपी प्रतिक्षा यादीतील लाभार्थ्यांचे



## आधार सिडींग व आवास प्लस मधील लाभार्थ्यांचे आधार सिडींग व जॉब कार्ड मॅपिंग

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत कायम स्वरुपी प्रतिक्षा यादी (ब यादी) मधील लाभार्थ्यांचे आधार सिडींग व आवास प्लस (ड यादी) मधील कुटुंब प्रमुख व कुटुंबातील सदस्यांचे आधार सिडींग/जॉब कार्ड मॅपींग करण्यासाठी अभियान कालावधीत जिल्हास्तरीय डेटा एन्ट्री ऑपरेटर तसेच ग्राम पंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्राचे डेटा एन्ट्री ऑपरेटर यांची मदतीने आवास प्लस मधील लाभार्थ्यांचा जॉब कार्ड क्रमांक उपलब्ध करुन घेतला. तसेच ज्यांच्याकडे जॉब कार्ड क्रमांक नाही त्यांना ग्रामीण रोजगार सेवक यांच्या मदतीने जॉब कार्ड क्रमांक मिळवून देण्यात आला.

अभियान कालावधीत कायमस्वरूपी प्रतिक्षा यादीमधील १०६२९२० पैकी ९८३९८५(९२.६%) लाभार्थ्यांचे आधार सिडींग पूर्ण केले. आवास प्लस मधील ४६७०४५५ पैकी १६६२५२१ (३५.६%) पात्र लाभार्थ्यांचे जॉबकार्ड मॅपींग केले. आवास प्लस मधील ५७६००५६ पैकी ५३३२१६२ (९२.७%) लाभार्थ्यांचे आधार सिडींग पूर्ण करण्यात आले आहे.

## शासकीय योजनांशी कृतीसंगम (Convergence)

